
# चैतन्य लहरी

अंक क्र. ३, ४

मार्च–एप्रिल २००२




वाढदिवस पूजा २००२







शिवरात्री (प्रतिष्ठान)
१२ मार्च, २००२









# अनुक्रमणिका

शिव पूजा; पुणे २००२........................................ २

वाढदिवस पूजा, दिल्ली २००२........................................ ७

शिव पूजा वृत्तांत........................................ ११

बनदेवी आयुर्वेदिक हर्बल प्रॉडक्टस प्रा.लि........................................ १७

दहा गुरुंची अवतरणे - सॉक्रेटिस........................................ १८

अमृत-वाणी........................................ २०

सहजसमाचार........................................ २२

संपर्क :

चैतन्य लहरी

द्वारा सहजयोग ध्यान केंद्र, प्लॉट नंबर ७९ सर्वे नंबर ९८, भुसारी कॉलनी , कोथरुड, पुणे -४११ ०३८

टेलिफोन : ०२०-५२८० ६६८

इमेल : chaitanyalaharipune@rediffmail.com

वितरण व्यवस्था : श्री. राजेंद्र मदने टेलिफोन (निवास) ०२०-७२७२ ६३३



# सत्त्वपरीक्षा

आजकाल जगभर व विशेषत: भारतदेशांत दिसून येत असलेल्या अशांत परिस्थितीचा व सहजयोगाचा संबंध याबद्दल श्रीमाताजींच्या अलिकडच्या प्रवचनांत स्पष्ट व परखड उल्लेख असतो. त्यापाठीमागची त्यांची भूमिका व विचार आपण नीटपणे समजून लक्षांत घेणें आवश्यक आहे. आपल्या देशांत तर परिस्थिति फारच वाईट व स्फोटक आहे व त्याचे राजकीय मंडळी व पुढाऱ्यांनी केलेले विश्लेषण वाचल्यावर मनांत उभारी अशी वाटत नाहींच उलट उद्वेगजनक प्रतिक्रिया मनांत उमटतात. रक्तपात, जाळपोळ, धर्म-जाति भेद, दहशतवाद इ. संघर्षानें अनेक बळि घेतले, अजूनही याच प्रश्नावरुन माणसे मारली जात आहेत. या अघोरी कृत्यांचे वैशिष्ट्य म्हणजे आशेला कुठें जागाच नाही ही उद्विग्नता. आग लागली की त्यांत तेल ओतण्यापेक्षा ती विझवण्याचा प्रयत्न करण्यांत सूज्ञता आहे हे कुणाच्या लक्षात कसे येत नाहीं याचे नवल वाटते.

ही परिस्थिति सुधारण्याचा एकमेव उपाय म्हणजे सहजयोग आहे हे श्रीमाताजी वारंवार सांगत आहेत. या प्रश्नांशी संबंधित सर्व मंडळींना आत्मसाक्षात्कार मिळाला तर त्यांच्या मानसिकेत परिवर्तन होऊनच हे भावनिक वैर संपणार आहे. शांतता-समित्या, समझोते, चर्चा, करार यामुळे प्रासंगिक शांतता लाभली तरी प्रश्नांचे मूळ तग धरुन राहते व कालान्तराने पुन्हां डोके वर काढते हा मानवजातीचा इतिहास आहे. सहजयोगातून घडून येणारे मानसिक परिवर्तन म्हणूनच महत्वाचे आहे.

हे परिवर्तन घडून येण्यासाठीं सहजयोग फार फार मोठ्या प्रमाणावर पसरला पाहिजे. त्यासाठींच लोकांना सहजयोग सतत सांगत चला, अधिकाधिक लोकांना जागृति देण्याचा सातत्यानें प्रयत्न करा असा श्रीमाताजींचा आग्रह असतो; मानव उत्क्रान्तीच्या पुढच्या टप्प्यावर येण्याचा हा बहार-समय असल्यामुळे मानवजातीवरच्या प्रेमाच्या पोटतिडिकीमुळे त्या आपल्याला कार्यरत होण्यास सांगत आहेत.वणवा लागल्यासारखा सहजयोग सगळीकडे पसरला पाहिजे या शब्दांत त्यांनी अलिकडेच उपदेश केला.

म्हणून सहजयोगाचा प्रसार करणें हे आपणा सर्वांचे अनिवार्य कर्तव्य आहे. साक्षात आदिशक्तीचा हा आदेश सर्व कांहीं बाजूला ठेऊन पाळणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे. हे केले तरच आपला सहजयोग सार्थकी लागणार आहे. हीच आपली सत्त्वपरीक्षा आहे या उदात्त भावनेंने आपण सर्वजण अजून जोमानें कार्यरत होऊं या.







# श्री शिव पुजा

प.पू.श्रीमाताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)
पुणे०, १७ मार्च २००२

**"एकादशरुद्र म्हणजे शिवांची शक्ती. सहजधर्माच्या व नियमांच्या विरुद्ध वागणाऱ्यांना एकादशरुद्रांचा क्रोध भोगावा लागतो"**

आज आपण श्रीशिवांची पूजा करणार आहोत. श्रीशिवांची पूजा करणाऱ्यांचे हृदय पूर्ण-पणे स्वच्छ असलें पाहिजे; तसे नसले तर ही पूजा करण्याचा अधिकार आपल्याला मिळत नाहीं. हे अगदी सरळ तत्व आहे. श्रीशिवांच्या हृदयांत अपरंपार प्रेम आहे. सामान्यत: मानवाला ईश्वरी शक्तीची जाणीव होणें अवघडच आहे; पशु-प्राण्यांना ती सहज समजते, कारण त्यांचे हृदय स्वच्छ असते व जन्मजात स्वभावाप्रमाणे त्यांचे जीवन चालत असते; त्यांच्या मनांत द्वेष, मत्सर इ. भावनाच नसतात. माणसांचे तसे नसते; माणसाच्या जीवनाची श्रेष्ठता तो किती प्रेम करतो व क्षमा करुं शकतो यावरुनच ठरते. हीन प्रवृत्ति बाळगणे वा अमानवी कृत्यें करणें आपल्या हिताचे नसते हे माणसाला उमजले की हे सहज जमण्यासारखे आहे. पण कां समजत नाहीं; माणूस द्वेष, मत्सर, भेदभाव इ. प्रवृत्तींकडे जास्त खेचला जातो. शिवांकडे नीट पहा; ते हिमालयांत आरामांत, शांतपणे असतात; त्यांना कसलीही गरज नसते; कारण ते परिपूर्ण आहेत.

श्रीशिवांची पूजा करण्याआधीं तुम्ही आपापले हृदय नीट तपासून बघा, हृदयांत काय भावना आहेत हे जाणून घ्या. आजकाल मनुष्याला पैसा म्हणजेच सर्वस्व आहे असे वाटते. पूर्वी आपली संस्कृति तशी नव्हती. विशेषत: परदेशांमधे पैसा हीच सर्वांत महत्त्वाची गोष्ट असते अशी समजूत आहे. शिवांना पैशाची काय जरुर असणार? कारण त्यांना श्रीमंतीचा देखावा करण्याची जरुरच पडत नाहीं. ते सरळ मार्गी आहेत; कुणी चूक केली तर त्याला शिक्षा करुन ते मोकळे होतात; लोकांना समजवण्याचा व सुधारण्याचा विचारच ते करत नाहींत. पण शक्तीची गोष्ट जरा वेगळी आहे; तिनेच सर्व कांही निर्मिति केली आहे, सर्व मानव तिला लेकरांसारखे आहेत आणि म्हणून तिला माणसांनी इतक्या हीन स्तरावर व मूर्खांसारखे वागलेले पाहवत नाहीं. फार पूर्वीपासून माणूस सत्तेच्या मागे लागला होता, देशामागोमाग देश पादाक्रान्त करु लागला होता; पण आता त्या महासत्तांचा मागमूसही उरला नाहीं. आता लोक दुसऱ्यांना सरळ ठार मारण्याच्या उद्योगांत गर्क आहेत. हे सर्व सुधारणे परमेश्वरी शक्तिकडूनच होणार आहे आणि सर्व दुष्ट लोकांचा नायनाट होणार आहे.

शिवांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांना चारित्र्यवान व सत्प्रवृत्त लोक आवडतात आणि अशा माणसांना कुणी वाईट माणूस त्रास देऊ लागला तर ते त्याला सोडणार नाहींत. तेव्हां शक्ति तुम्हाला सांभाळणारी, रक्षण करणारी, मार्गावर आणणारी



आहे तर शिव शिक्षा करणारे आहेत. माणसामधील गर्व व अहंकाराचा नाश करणारेही तेच आहेत. नुकताच मला एक माणूस भेटला; मूर्खासारखा , उध्दटपणे बोलत होता, आणि त्याच्यावर एकादश रुद्र एकदम रुद्र स्वरुपांत कोपाविष्ट झाल्याचे मला दिसले, तेव्हा त्याची आतां धडगत नाहीं हे मला समजले. एकादश रुद्र ह्या शिवांच्याच शक्ति आहेत व त्यांच्या क्रोधामधून माणसाचे काय होईल सांगता येणार नाही.सहजयोगी सुध्दा सहजधर्माच्या व नियमांच्या विरुध्द वागले तर त्यांनाही एकादश-रुद्रांचा क्रोध भोगावा लागतो. सहजयोगी म्हणून तुम्ही काय करता, कसे वागता इकडे त्यांचे लक्ष असते. तुम्हाला वेळोवेळी उपदेश मिळतो, संतांचे मार्गदर्शन मिळते, पण तरीही तुम्हाला ते सर्व समजले नाहीं तर शिव कार्यान्वित होतात; *ते एकदा रागावले म्हणजे रागावले, त्यांना कांही पटवून देण्याचा वगैरे प्रश्नच नाही. त्यांचा मूळ स्वभाव क्षमादायक आहे; एका विशिष्ट मर्यादेपर्यंत ते क्षमा करतच असतात; पण तुम्ही एकदां ती मर्यादा ओलांडली की त्यांचा राग कुणी आवरु शकत नाही* व ते संहारच करतात. मला वाटते की शिवांना अजून लोक नीट समजू शकले नाहींत.

दक्षिण भारतात शैव व वैष्णव अशा दोन पंथांचे लोक आहेत- पूर्वी त्यांच्यात खूप भांडणे असत पण आतां ते वाद खूप कमी झाले आहेत. विष्णु ही तुमच्या उत्थानाची शक्ति आहे; तुम्ही जर नीतिमत्ता व सदाचरण सोडून धर्माविरुध्द गेलात तर शिव त्यांचे कार्य करु लागतात. आपल्या सर्वांना या शक्तींनीच निर्माण केले आहे आणि त्या सदैव आपल्याकडे लक्ष ठेऊन आहेत हे नीट समजून घ्या. शक्ति जरी तुमचा संभाळ करत असली तरी तुम्ही तुमच्या धर्माच्या मर्यादा पाळल्याच पाहिजेत. कारण ती त्यांच्या पलीकडे जाऊन तुम्हाला मदत करुं शकणार नाहीं. आजकाल कसल्याही भल्या-बुऱ्यामार्गाने पैसा कमवण्याच्या मार्गे लागलेले लोक खूप दिसू लागले आहेत; त्यांना तुमच्या हिताची पर्वा नसते. पण त्यांचे फार काळ चालणार नाहीं; कारण एकादश रुद्र त्यांच्यावर लक्ष ठेऊन आहेत. माणसांना होणारे दुर्धर व असाध्य रोग त्यांचाच कोप असतो. सर्व धर्मांमधे सध्या तुम्हाला फसवणारे, चुकीचे मार्गदर्शन करणारे व तुम्हाला लुटणारे लोक आहेत. पण तुमचा स्वत:चा विवेक जर जागृत नसेल तर तुम्हाला कोण वाचवणार? योग्य-अयोग्य, हितकारक -विनाशकारक हे समजण्याचा विवेक तुम्हीच बाळगला पाहिजे. सहजयोगांतही कांही खराब चारित्र्याचे, पैशाच्या वा मुलींच्या मागे असणारे कांही लोक आहेत असे माझ्या निदर्शनास आले आहे. पाश्चात्य देशांचेही यामुळे खूप नुकसान झाले आहे. म्हणून तुम्हीच तुमचा आत्मसन्मान राखला पाहिजे; तसे केलेत तरच मी तुम्हाला तुमच्याकुडलिनी मधून मदत करुं शकते. पण तुम्ही त्याच्याही पलीकडे जाऊन चुकीच्या व अनैतिक गोष्टी करत राहता तेव्हा मी कितीही क्षमा केली तरी एकादशरुद्र तुम्हाला शिक्षा केल्याशिवाय राहणार नाहींत; त्यात तुमची मानहानी, दुष्कीर्ति, आजार इ. कसलीही संकटे तुमच्यावर येतील. म्हणून एकादशरुद्र तुमच्यावर सतत नजर ठेऊन आहेत हे विसरुं नका. *शिवांना नीट समजून घेतले की तुमच्या लक्षांत येईल की त्यांना कशाचीही जरुर भासत नाहीं,* शिवाय त्यांचे स्वत:चे असे कांही नसतेच; जे कांही भक्त देतात तेहि ते शक्तीला देऊन टाकतात. कारण तुमची काळजी घेणे वा तुम्हाला मदत करणे हे तिचेच काम असते; शिवांना तुमच्यासाठी कांहींच करायचे नसते. इतके असूनही शिवांना प्रसन्न करुन घेणे फार फार अवघड आहे; तुम्हाला प्राणपणाने त्याचा ध्यास घ्यावा लागेल.

कुराणांत एक अल्ला शिवाय दुसऱ्या कुठलेही देवतेचा उल्लेख नाहीं. त्यावेळचे लोक निरक्षर होते म्हणून त्यांना कांही वाचून समजणे शक्य नव्हते; म्हणून वेगवेगळ्या देवतांची शक्ति व त्यांचे कार्य यांचे कांहींच उल्लेख कुराणांत नाहींत.अल्ला हाच एकमेव देव त्यावेळी सांगितला होता. पण खरे तर सर्व कार्य करणारी ही शक्तिच आहे.



म्हणून तुम्हा सहजयोग्यांना सांगावेसे वाटते की उठबस रागावणें, सारखे कशाच्यातरी मागे लागणे हे सहजयोग्यांना शोभा देत नाहीं. अर्थात तुम्ही जीवनांत जसे आहांत तिथेंच सुखी-समाधानी रहावे हीच माझी इच्छा आहे; तुम्हांला संसार सोडून जंगलात जायची अजिबात जरुरी नाहीं. पण त्याचबरोबर तुमची सर्व आसक्ति दूर झाली पाहिजे; हृदयांत कसलीही आसक्ति राहता कामा नये. जो खरा शिवभक्त असतो त्याला कसलीही जरुर नसते. तो कांहीही मागत नसतो, पैशाचा तर त्याच्या मनात विचारही येत नाहीं; त्याला तुम्ही कांहींही मागा, तात्काळ तो ते तुमच्या हातांत देईल; असा भक्त कमालीचा उदार असतो.

शिवांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची कधीही कशाचीही मागणी वा इच्छा नसते. ते पूर्णत; स्वतः बरोबरच शांतपणे मस्त असतात; कोण आला, कोण गेला इ.चीही त्यांना फिकीर नसते. एवढेंच नव्हे तर सूर्य-चंद्र- तारे हेहि आपापले काम करत आहेत कां याचीही त्यांना काळजी नसते. कारण ते या सर्वाच्या फार फार पलीकडे आहेत. पण त्याचबरोबर ते आनंदात मग्न आहेत, सच्च्या भक्ताकडून केल्या गेलेल्या पूजेनें ते प्रसन्न होतात; हृदयापासून भक्तांनी दिलेल्या कांहीही भेटवस्तूचा त्यांना आनंदच होतो. याचे एकमेव कारण म्हणजे त्यांच्याजवळ कंडिशर्निंग नावाला सुध्दा नाहीं; ते absolptely unconditioned आहेत. तुमच्यामधीलही कंडिशर्निंग पूर्ण गेल्याशिवाय तुम्ही खरे शिव भक्त होऊ शकणार नाहीं. म्हणून शिवपूजा करणाऱ्यानें स्वतः मधील कंडिशनिंग पूर्णपणे काढून टाकले पाहिजे.

लोकांना सतत कशाच्या ना कशाच्या कण्डिशन्स असतातच; अगदी बारीक सारीक गोष्टींबद्दलही असतात; फॅशन ही तर आजकाल मोठीच कंण्डिशन बनली आहे; इतके की फॅशनच्या मागे लोक वेड्यासारखे लागतात. आणखी एक वाईट संवय म्हणजे लोकांना सारखी टीका(criticism) करण्याची सवय असते; कुणा व्यक्तीबद्दल, घटनेबद्दल, घराबद्दल, कार्पेटसारख्या वस्तूंबद्दल इ. कशावरही कॅामेंट करण्याचा कांहीजणांना नादच असतो. शिवांना फॅशन समजत नाहीं, पैसा लागत नाहीं, कपडेलत्यांची फिकीर नाहीं, तुम्ही कांहीही दिले तरी ते समाधानी होतात; कारण मूर्तिमंत आनंद व शांति यांचे ते साक्षात पूर्णस्वरुप आहेत. म्हणून शिवभक्तांनाही नेहमी आनंद मिळवायची वृत्ति जपली पाहिजे; प्रत्येक वस्तूपासून , समोर आलेल्या प्रत्येक व्यक्तीपासून त्यांनी आनंद मिळवायचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी 'मला हे आवडत नाहीं ' ही भाषाच सोडून द्या. पाश्चात्य लोकांमधें ही फार आढळते; घर, पेहराव, हॅट, हेअर-स्टाइल अशा कशाबद्दलही ते ही भाषा (I don't Like) वापरत असतात. त्याच्यामागे दुसऱ्यावर छाप कशी मारायची (impress) हा स्वार्थी मतलब असतो, त्यांत सवंग प्रसिध्दीची हाव असते.शिवभक्तांना हे शोभत नाहीं. आपण सहजयोगी आहोत, शिवभक्त.आहोत हे लक्षांत घ्या; अर्थात श्रीशिव आपल्या हृदयांत आहेत आणि त्या शक्तीचे तेज आपल्याला कुण्डलिनीकडून जाणवत आहे. शिव जसे आनंदाच्या महासागरामध्ये हरवल्यासारखे मस्त आहेत तसे तुम्ही व्हा. म्हणजे दुसऱ्या माणसांचा ड्रेस, स्टाइल, फॅशन इ. तुमच्या नजरेस न येता त्यांची व्हायब्रेशन्स तुमच्या लक्षांत आली पाहिजेत. म्हणजेच तुमची जीवनमूल्ये बदलली पाहिजेत. तुम्हाला एखादी व्यक्ति आवडत नसेल तर तुम्ही सहजयोगी नाहीं असे समजा.



सहजयोगांतील सर्व प्रश्न योगी लोक स्वत:चाच विचार करतात (आत्मकेंद्रित) म्हणून येतात. माझ्याकडे बरेच सहजयोगी इतर योग्यांबद्दल तक्रारीच्या सुरात बोलतात आणि त्या लोकांना मी विचारले तेव्हां ते ह्यांच्याबद्दल बोलतात; मला याचे आश्चर्यच वाटते. त्याचप्रमाणें बरेच सहजयोगी नियमित सेंटरवर किंवा पूजेला येत नाहींत कारण कसल्यातरी व्यापात वेळ मिळत नाहीं ! हेहि मला समजत नाहीं. खरे तर सच्चा शिवभक्तांनाच पूजेचा आनंद मिळतो आणि त्या चैतन्यानें ते न्हाऊन निघतात. आणखी एक म्हणजे कांही जण सहजयोगातून पैसा कसा मिळेल याच्याच विचारात असतात. सहजयोगांत तुम्ही परमात्म्याचे आशीर्वाद मिळवण्यासाठीं आलेले आहांत; ते नको असेल तर सहजयोग सोडून द्या आणि दुसरे काय हवे ते करा. सहजयोगामधें तुमच्या आवडी-निवडी पार गेल्या पाहिजेत. या आवडी-निवडी तुमच्या संकुचित वृत्ति व दृष्टिकोनामुळे येतात. दुसऱ्याच्या चांगुलपणाकडे तुमचे लक्ष जायला हवे व त्याचे कौतुक करायला शिकले पाहिजे. बाहेर चांगले काय आहे हे जाणण्याच्या वृत्तीमधून तुम्ही किती अध्यात्मिक आहांत हे दिसून येणार आहे. दुसऱ्यामधील गुणांचे कौतुक व दोषांबद्दल उदासीनता हे संस्कार मला माझ्या वडिलांकडून मिळाले. तसे नसाल तर तुम्हीच आनंदाला पारखे व्हाल. तुम्ही इतक्या विविध जातीचे व प्रांतांचे सहजयोगी माझ्या समोर आहांत पण माझ्या दृष्टीला तुम्ही फक्त सहजयोगी आहांत एवढेच जाणवते.

सहजयोगी म्हणून तुमची सर्वांत महत्वाची जबाबदारी व कर्तव्य म्हणजे सहजयोगाचा प्रसार करणें. जगभरातील मानवांमधें परिवर्तन घडवून आणणे हेच तुमचे ध्येय असले पाहिजे; आणि त्यासाठी अथक प्रयत्न तुम्ही करत राहिले पाहिजे. माझे विशाल स्वप्न साकार करण्यासाठीं आपल्यालाच हातभार लावला पाहिजे याचे भान तुम्ही जिवंत ठेवले पाहिजे. तुमच्यामधें हे भान जागृत करण्यासाठी व तुम्हाला कार्यासाठी शक्ति मिळण्यासाठींच पूजा असतात. तेव्हां फक्त पूजा आहे म्हणून इथें येण्याचा एरवी कांहीं उपयोग नाहीं. लखनौसारख्या ठिकाणी मी पूर्वी गेले होते तेव्हा तीन हजार सहजयोगी होते पण आता फक्त २०० च आहेत. याचा अर्थ सहजयोगाचे कार्य तुम्ही गांभीर्यानें मनावर घेत नाहीं किंवा तुम्ही त्यासाठी कुचकामी आहात. प्रत्येक सहजयोग्याची ही सर्वांत प्राथमिक जबाबदारी आहे. किती लोकांना जागृति दिली, किती लोकांना सहजयोग सांगितला हे महत्वाचे आहे आणि हे सतत करत राहिले पाहिजे. प्रवासात, विमानांतही मी पाहते की इतर प्रवासी त्यांच्या गुरुंबद्दल - मग ते कुणीही, कसेही असोत- न लाजता, कसलीही भीडमुर्वत न बाळगता, सर्रासपणें सांगत सुटतात; मग तुम्हाला सहजयोगाबद्दल बोलायला संकोच का वाटतो? *तुम्ही माझ्यावर खरोखरच प्रेम करत असाल व माझ्याकडून संरक्षण मागत असाल तर तुम्ही स्वत:ला उच्च दर्जाचे सहजयोगी बनवा आणि पूर्णार्थानें सहजयोग प्रसार-कार्याला वाहून घ्या*. ऑस्ट्रिया, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड मधें खूपच कार्य झाले आहे; पण सर्व ठिकाणी तसे होत नाही; याला कारण म्हणजे सगळीकडचे लिडर्स त्यासाठी मेहनत घेत नाहींत. युनिव्हर्सिटि, शाळा, ऑफिसेस असे सगळीकडे सहजयोग सांगा. हिप्पी लोक सगळीकडे पसरले तर सहजयोग कां नाहीं पसरणार? *वणवा लागल्यासारखा सहजयोग चारी दिशांनी पसरला पाहिजे*. आपण सहजयोगांत कशासाठी आलो आहोत हे आत्मपरिक्षण करुन नीट समजून घ्या, सहजयोगी म्हणून आपली जबाबदारी काय हे ध्यानांत घ्या आणि जागृति देण्याच्या व सहजयोगाच्या प्रसार कार्याला लागा.

आजच्या या शिवपूजेमधून तुम्हाला सहजयोगाला व शिवतत्वाला समर्पित होण्याची शक्ति मिळेल अशी माझी खात्री आहे. शिवतत्त्व अत्यंत शक्तिशाली आहे. मीसुध्दां शिवांना तुम्हाला आशीर्वादित करण्याची प्रार्थना करते.

सर्वांना अनंत अशीर्वाद.







# वाढदिवस पूजा

प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)

निर्मलधाम दिल्ली दिनांक २१ मार्च २००२

**"सृष्टीमध्ये सर्वत्र पसरलेल्या परमचैतन्याच्या प्रेमशक्तीचे तुम्ही वाहक बनले पाहिजे."**

इथें पसरलेला हा प्रेमसागर पाहून माझें हृदय भरुन आले आहे. या प्रेमप्रवाहाचा एवढा महासागर कसा निर्माण झाला हेहि लक्षांत आले नाहीं इतकी ही सुंदर घटना आहे. प्रेमाचे शास्त्र असे कांहींच नसते कारण त्याची शक्ति महासागरासारखी सर्वदूर पसरलेली आहे; इतकी की त्याची व्याप्ति लक्षांत येणे अवघड आहे. परमात्म्याची ही प्रेमशक्ति साऱ्या विश्वामधें, सर्व देशांमधें, सर्वत्र ठायी ठायी पसरलेली आहे. तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतरच तुम्ही ती जाणूं शकता. प्रेम हीच त्या परमात्म्याची शक्ति आहे आणि प्रेमामधूनच ती कार्यान्वित होत असते. सर्वसाधारण लोकांच्या हे लक्षांत येत नाहीं; दुसऱ्याबद्दल मत्सर वा द्वेषभाव बाळगणें, दुसऱ्याशी भांडण-तंटा करणें या सर्व हीन प्रवृत्ति आहेत. *तुम्ही सहजयोगी आहांत म्हणून तुमच्या मनांत सदैव प्रेमभावनाच फुलली पाहिजे.*

आपल्या या भारतदेशांत सध्या जी अशांत परिस्थिति दिसत आहे ती बघितल्यावर मनांत प्रथम जाणवते की धर्माच्या नावाखाली लोक एवढे अकांडतांडव कसे करु शकतात? धर्माबद्दल कुणी कांही बोलले वा केले की त्याची तीव्र प्रतिक्रिया दुसरे लोक लगेच व्यक्त करुं लागतात; या क्रिया-प्रतिक्रियेला कांही अर्थ नसतो; उलट त्यामुळें लोकांच्या मनांतील परमात्म्याच्या अस्तित्वाची भावना क्षीण होत जाते. म्हणून परमात्म्याची ही प्रेमशक्ति लोकांच्या मनांत कशी दृढ करता येईल याचा तुम्ही विचार केला पाहिजे. मी म्हणेन की त्यासाठी आपण लहान मुलांपासून सुरुवात केली पाहिजे. आपण मुलांना काय शिकवतो व शिकवायला पाहिजे इकडे लक्ष द्या. आपल्या मुलाला दुसऱ्याच्या मुलांने मारले तर त्याला जाऊन उलट थप्पड मारायला आपण सांगणार कां? त्याऐवजीं त्याला समजावले की-मारलं तर मारलं, जाऊ दे, कांही बिघडत नाहीं- तर तो मुलगाही राग विसरुन जाईल. मुले जात्याच अबोध व सरळ स्वभावाची असतात. दुसऱ्या मुलाला मारणें ही वाईट गोष्ट आहे व मुलांनी ती करुं नये असे त्याला समजावले पाहिजे. मारपीट करण्याची ही प्रवृत्ति लहान वयापासूनच घालवली पाहिजे. याच्या उलट लहानपणींच 'तूं हिंदू आहेस, तो मुसलमान आहे' असे भेदभाव त्याच्या डोक्यांत भरवणें चूक आहे. द्वेष, मत्सर, घृणा, इ. दुष्ट प्रवृत्ति सहजयोगामधून नाहींशा होतात व तसे झाल्यावरच परमात्मा काय आहे व त्याचा आपल्याशी काय संबंध आहे हे तुमच्या लक्षांत येईल.

*परमात्म्याची सर्व वातावरण व्यापून राहिलेली ही शक्ति जाणण्यासाठी तुम्ही अबोधितता जोपासली पाहिजे.* लहान मुले अबोधित असतात. ज्याच्या स्वभावांत वैरपणाच भिनलेला आहे त्याला कुणीच वाचवू शकणार नाहीं, त्या दुर्गुणाचे कितीही समर्थन करण्यात अर्थ नाहीं. शांत व सुस्वभावी समजल्या जाणाऱ्या लोकांच्या आपल्या देशांतही लोकांचा खून करायलाही न कचरणारे कांही जण असतील. पण मुळांत येथील





लोकांना शांतता आवडते; शांति प्रस्थापित झाल्याशिवाय विकास संभवत नाही; समाजाच्या सर्व व्यवहारांमधे शांति असेल तरच तो देश नांवारुपाला येतो. भय, धाक, जबरदस्ती वापरुन हे होत नाही. शांति ही हृदयांतील एक सुंदर भावना आहे; ज्याच्या हृदयांत शांति असते त्याच्या सहवासातूनही शांतीच पसरते. असा माणूस निर्भय असतो.

तुम्ही सर्वजण सहजयोगी आहांत, तुम्हाला आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला आहे; अर्थात तुमच्या आत्म्याकडून चैतन्य पसरत आहे; त्या चैतन्यामधूनच शांति व आनंद पसरणार आहे. कुठेही असलात तरी तुमच्याकडून शांत चैतन्य लहरीच पसरतील; त्यामुळेच सगळीकडे शांततेचे साम्राज्य व वातावरण तयार करण्यासाठी तुम्ही समर्थ आहांत. *तुमची वाढ अशीच व्हायला हवी की ज्यामुळें तुम्ही सर्वांसमोर आदर्श व्हाल.* दिल्लीसारख्या या ठिकाणीही इतके आत्मसाक्षात्कारी लोक होतील असे मलाही कधी वाटले नव्हते. सर्वप्रथम लोक माझी भाषा समजून घेण्याइतक्या मनःस्थितीवर येईपर्यंत मला वाट पहाणें जरूरीचे वाटले. स्वातंत्र्य होण्याच्या काळांत लोकांना भयानक आपत्तींना सामोरे जावे लागले, कित्येकांचे सर्व संसार उध्वस्त झाले, मी हे प्रत्यक्ष बघितले आहे; त्यांना क्षमा या शब्दाला कांही अर्थच उरला नव्हता. खरे तर दुसऱ्याच्या वेदना जाणण्यासाठीं क्षमेइतका दुसरा कुठलाच उपाय नाहीं. क्षमा करण्याची शक्ति आपण जोपासलीच पाहिजे. दुसऱ्यांवर रागवण्याऐवजी, त्यांच्याबद्दल सूडभावना बाळगण्याऐवजी पममेश्वरी प्रेमशक्तिमधून मन शांत करण्याची कला तुम्ही साध्य करु शकला तर दुसरे कांहीही करण्याची तुम्हाला जरुरी नाहीं. फक्त हृदयांतील या शांतीचा जाणीवपूर्वक अनुभव घ्या. मग तुम्ही दुसऱ्या कसल्याही परिस्थितीत अस्वस्थ होणार नाही., कुणावर उठसूठ रागावून वातावरण बिघडेल असे वागणार नाहीं आणि सूड, द्वेष, क्रोध या सर्व दोषांपासून मुक्त व्हाल.

ज्यांना आत्मसाक्षात्कार मिळालेला नाहीं त्यांना हे समजावून सांगणे अवघड आहे; त्यांच्या डोक्यांत ते शिरणारच नाहीं. *म्हणून सहजयोग पसरवणें हाच एकमात्र उपाय आहे.* हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन कुणीही असले तरी त्यांना सहजयोग सांगत चला. आजकाल हिंदु लोकांना सहजयोगाची विशेष जरुरी आहे कारण तेच आपल्या देशाची व आपल्या संसकृतीची महानता विसरत चालले आहेत. आजचा हा राममंदिराचाच प्रश्न घ्या. अयाध्येमधे राममंदिर बांधण्याला विरोध करणाऱ्यांना त्याच ठिकाणी श्रीरामांचा जन्म झाला होता हे मी कसे सांगणार? पण हे जर व्हायब्रेशन्सवर दिसून येत असेल तर फक्त विरोधासाठीं विरोध करण्यांत काय अर्थ आहे? हीच रामजन्मभूमि आहे ही व्हायब्रेशनवरुन सिध्द होणारी गोष्ट नाकारणे म्हणजे रामावतरणच नाकारण्यासारखे आहे. आता हा बाबर कोण? तो परदेशांतून आला होता व त्यानें ही वास्तू बांधलेली नाहीं तर त्याच्या एका सरदाराने ती बांधली. म्हणूनच त्याला बाबरी-मशिद म्हणतात. पण बाबर परदेशी होता, त्याचा जन्मही भारतांत झाला नव्हता आणि परदेशांतून तो इकडे स्वारीवर आला होता.फक्त त्याचा मृत्यू भारतात झाला. मला तर पक्के माहित आहे - आणि तुम्हीही तुमच्या हातांवर हे जाणूं शकता-की याच ठिकाणी श्रीरामांचा जन्म झाला. मग तिथेंच त्यांचे मंदिर बांधण्यांत कांहीच गैर नाहीं. श्रीरामांचे नुसते नामही शांति-समाधान देणारे आहे, मीसुध्दा त्यांचे नाम आदराने घेते. तोच प्रकार काश्मीरमधें मोहम्मदसाहेबांच्या केसा(बाल) वरुन झाला. पण लोकांना त्यांतील सत्य जाणून घ्यायची तयारी नाहीं. मी एकदा काश्मीरमधें कारमधून फिरत असताना अचानक मला प्रचंड व्हायब्रेशन्स जाणवल्या. म्हणून रस्ता सोडून त्याबाजूला गाडी नेण्यास ड्रायव्हरला सांगितले; त्याला अर्थातच कांहीं समजले नाही; पण पुढे गेल्यावर एका लहानशी वस्ती लागली. ते मुसलमान लोक होते. त्यांच्याकडे चौकशी केल्यावर समजले की त्या गावांत 'हजरत-बल' होता; पण मुसलमानांना जसे श्रीराम समजत नाहींत तसेच हिंदूंना मौहम्मदसाहेब समजत नाहींत.दोन्ही लोक आपआपली दुकानें मांडून बसले आहेत पण दोघांकडे विक्रीसाठीं ठेवलेल्या वस्तू एकच आहेत ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं. अल्लाचे नांव घेणाऱ्या लोकांना अल्ला हे विष्णूचेच रुप आहेत हे माहित नाहीं.आणि तेच श्रीराम म्हणून अवतार घेऊन आले हे फक्त सहजयोगींच जाणूं शकतात. आत्तां





मी बोलतानाही तुम्ही माझ्याकडे हात करुन हे पाहिले तर तुम्हालाही ते समजेल. म्हणजे श्रीराम हेच अल्लाही आहेत हे लक्षांत न घेण्याचा मूर्खपणा ते लोक करत आहेत असेच म्ह्टले पाहिजे आणि हिंदु-मुसलमान म्हणून भांडत आहेत. आत्मसाक्षात्कार न मिळाल्याने हा प्रश्न बिकट झाला आहे. राजकारणी, पुढारी, क्रॅबिनेटमधिल अधिकारी लोक आत्मसाक्षात्कारी असते तर त्यांच्याशी आपण हे सर्व बोलूं शकलो असतो; हा वाद घालणे हाच मूर्खपणा आहे हे त्यांना समजावले असते आणि तिथे श्रीराम मंदिर उभारणें योग्यच आहे हे त्यांना पटले असते. म्हणून हे सर्व लोक सहजयोगी झाले पाहिजेत.

कांही लोक मला एकदा सांगत होते की त्यांनी कांही महंत-मंडळींना जागृति दिली आणि ते सर्वजण expose झाले. हे होणारच; मग ते लोक ख्रिश्चन असोत वा कुठल्याही पंथाचे असोत. अशा लोकांना फक्त व्हायब्रेशन्स देणेच चांगले. माझ्या प्रेमापोटी 'तुम्ही आत्मसाक्षात्कारी नाहींत' असे मी त्यांना सांगू शकत नाहीं, आणि 'तुम्हला श्रीराम किंवा मोहम्मदबद्दल कांही बोलण्याचा अधिकार नाही' असेही त्यांना म्हणू शकत नाहीं. ते अवतारी पुरुष त्यांना समजण्याच्या खूप पलिकडे आहेत. हाच ज्ञानी आणि अज्ञानी माणसांमधील फरक; फार पूर्वी ही मोठी दरी होती कारण आत्मसाक्षात्कार मिळालेला एखादाच असायचा, आणि इतरेजन त्यांचा छळ करायचे. पण आता तुम्ही मोठ्या संख्येचे आहात. तरीही तुमचे सर्वजण ऐकतीलच असे नाहीं म्हणूनच मे तुम्हाला विनंति करते की जितक्या लोकांना जागृति देता येईल तेवढ्यांना द्या. वरुन अध्यात्मिक दिसणाऱ्या लोकांच्या मागे लागू नका.प्रेम वरवरचे असून चालत नाहीं ज्याचे अंतरंग शुध्द असते तोच प्रेमाची शांति मिळवतो. तसा प्रयत्न करुन स्वत:ला सुधारायचा अभ्यास करत चला. राग-लोभ इ. तुमच्या मनांत असले तर कार्य होणार नाहीं. परमेश्वरी प्रेम खऱ्या अर्थाने समजण्यासाठी तुम्हाला आधीं अबोधिततेचे महत्व समजले पाहिजे. लहान मुले अबोधित असतात म्हणून मी त्यांच्यावर प्रेम करते.

आजकाल सगळीकडे भ्रष्टाचार माजला आहे व एखाद्या संसर्गजन्य रोगासारखा फैलावत आहे. लोक पैशाच्या मागें धावत असल्यामुळें भ्रष्टाचार चालतो. गुपचूप पूजून ठेवलेला हा पैसा कधी कधी अचानक गडप होतो किंवा चोरीला जातो किंवा भ्रष्टाचार उघडकीला येऊन शिक्षा मिळते. पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे कां होते हे बघणे. आश्चर्य म्हणजे गरीब माणसांपेक्षा श्रीमंतांना पैशाचा लोभ अधिक असतो. एक तर गरीब माणूस देवाला घाबरतो पण श्रीमंतांना पैशाचीच चटक लागते. आपल्यासारख्या देशांत हा नवा रोग फोफावत आहे ही आश्चर्याची गोष्ट आहे. सहजयोगातही त्याचा शिरकाव झाला आहे व कांही जण सहजयोगांतही धंदा करु लागले आहेत व पैसा कमवत आहेत. हा उजव्या बाजूकडचा दोष आहे आणि त्यामुळे लोक त्याचे समर्थन करु पाहतात. या भ्रष्टाचारामुळे देशाचे फार नुक्सान होणार आहे; आणि विकास साधणें अशक्य होणार आहे. पण तुमच्या हृदयांत देशाबद्दल खरोखर प्रेम असेल तर तुम्ही या गैरमार्गाकडे वळणार नाहीं. *पण सध्या ह्या प्रेमाचीच उणीव आहे; प्रेम म्हणजे काय हेच लोकांना कळेनासे झाले आहे.* आपल्या मुलांवरही कांही लोक असे प्रेम करतात की बिचाऱ्याच्या आयुष्याचे नुकसान करतात. खरे तर प्रेमाला कसली मर्यादा नसते; ते अमर्याद, असीम आहे; हे प्रेम सबंध जगाला व्यापणारे आहे, सृष्टीमधें ते पसरलेले आहे, तुम्ही फक्त त्याचे वाहक बनायचे आहे (Agents of Love). तुम्हाला तसे बनण्याचा पूर्ण अधिकार आहे आणि तुम्हीच ते सगळीकडे पोचवूं शकता. पण इथे सुध्दा पैशाच्याच मागे असलेले लोक मला दिसतात. पैसा हा प्रेमाचा शत्रू आहे. मी अगदी निक्षून सांगते की तुम्हाला पैशामधे इंटरेस्ट असेल तर तुम्ही सहजयोगात कांहीही प्रगति मिळवूं शकणार नाहीं. मला तर पैसा समजतच नाहीं, त्याच्यांत इंटरेस्ट घेणे तर दूरच. मला पैसे मोजता येत नाहींत म्हणून लोक हसतात; पण पैशाकडे पाहून ते किती आहेत हे मी नक्की सांगू शकेन. पैशाहून कितीतरी अधिक चांगल्या व सुंदर गोष्टी जीवनांत आहेत; उदा. चांगली मुले, चांगली माणसे, सुंदर फुले सगळ्या जगभर आढळतात; मग पैशाकडेच कशाला लक्ष द्यायचे? तो



जसा येतो तसाच जातोही. पण त्याचे आकर्षण फार जबरदस्त असते. भारताचाही भ्रष्टाचारी देशामधे फार वरचा क्रमांक आहे. असे म्हटले जाते. म्हणून तुम्ही या बाबतीत काळजी घ्या; सहजयोगांत तुम्हाला पैसा कधीही कमी पडणार नाहीं याची खात्री बाळगा. पैशापेक्षा तुम्ही किती लोक सहजयोगांत आणले याला महत्व आहे. ही विनामूल्य पण अत्यंत आनंददायी गोष्ट आहे.

सहजयोग्याचे जीवन म्हणजे आनंदी आनंद आणि पूर्ण मुक्तता; कसलीही चिंता नाहीं, तुमच्यावर अवलंबून असे कांहीच नाहीं. अगदी गरीबींत असाल तरी आनंदाला कांही कमी नाहीं. श्रीमंत लोकांना, विशेषत: परदेशांतील श्रीमंतांना मानसिक ताणतणावाखालीच दिवस काढावे लागतात, विचित्र समस्या असतात, कांहींजण वैतागून आत्महत्या करुन घेतात. शिवाय तुम्हाला नसत्या फॅशनच्या फंदात पडावेसे वाटणार नाहीं. एरवी लोक वेड्यासारखे फॅशन्सच्या मागे लागतात. तुम्ही सहजयोगी असल्यामुळेच त्यांच्याहून वेगळे असता. तरीही त्यांचा तिरस्कार न करतां त्यांच्याबद्दल तुम्ही करुणा बाळगली पाहिजे; त्यांना नीटपणे समजावून जीवनांत उच्च असे कांहीतरी मिळवण्याची प्रेरणा द्या, आत्मसक्षात्कार मिळवण्याचे महत्त्व सांगा. हा काळ आता हे घटित होण्यासाठीं योग्य आहे. पण तुम्ही कार्यरत झाले पाहिजे. तुम्ही हे मोठ्या प्रमाणांत करु शकता. मी बरेच लोक सामाजिक कार्य करणारे पाहिले आहेत, त्यांचा पिंड अध्यात्मिक नसतो आणि त्यांना आत्मसाक्षात्कारही झालेला नसतो. पण अनाथ, गरीबांना आसरा देण्यासारख्या सामाजिक कार्यामुळे ते प्रसिध्दिला आलेले असतात. पण तुमच्यातील प्रेमशक्ति कार्यान्वित झाली की इतक्या मोठ्या प्रमाणावर लोकांना सहजयोग समजेल की तुम्हीच आश्चर्यचकित व्हाल. सहजयोगात खूप चांगले लोक आहेत पण त्याचा परिणाम दिसून आला पाहिजे; लोकांना तुमचे प्रेम समजले पाहिजे. त्यासाठी सर्वप्रथम तुम्ही क्षमाशील झाले पाहिजे; लोक मूर्ख असले तरी तुम्ही त्यांना क्षमा केली पाहिजे; शहाणपण बाळगून त्यांच्याशी वागा आणि त्यांच्या फॅशन वा ग्रुप बनवण्याच्या भुलथापांना बळी पडू नका. तुम्ही सहजयोगी आहात हे विसरु नका; तुमच्याबरोबर आणखी असले वा नसले तरी बिघडत नाहीं.तुम्ही उच्च स्तरावर पोचलेले लोक आहांत म्हणून तुमच्या दैनंदिन व्यवहारांतही प्रेम व्यक्त झाले पाहिजे; लोकांशी वागताना ते प्रेम दिसले पाहिजे; त्या प्रेम-व्यवहाराने लोकांना समाधान वाटले पाहिजे. दुसऱ्यांशी भांडणे. दुसऱ्यांना खाली खेचण्याचा प्रयत्न करणें, दुसऱ्यांना फसवणें इ. प्रकार सहजयोग्यांना शोभत नाहींत, तसले विचारही तुमच्या डोक्यांत येता कामा नये.हे मिळवलेत की तुम्ही स्वच्छ, निर्मल झालात असे म्हणता येईल.मग कुणीही तुम्हाला धक्का लावू शकणार नाहीं. या भावनेने तुम्ही आत्मसन्मान करु शकाल व स्वत:ला बरोबर ओळखू शकाल. साक्षात्कारी पुरुष अशी स्वत:ची ओळख विसरुन चालणार नाहीं; त्या दृष्टीनें आपण काय केले पाहिजे, कसे वागले पाहिजे हे लक्षांत ठेवा. तुम्ही वेड्यासारखे, कशाच्या तरी मागें लागलेल्या किंवा स्पर्धेत उतरलेल्या लोकांसारखे वागून चालणार नाहीं. परमचैतन्याच्या आशीर्वादासाठी तुम्ही सतत लायक राहिले पाहिजे; लहान मुलासारखे बनलात तरच तुम्ही परममेश्वराच्या राज्यांत प्रवेश करु शकाल असे ख्रिस्त म्हणाले होते. तुम्ही परमेश्वराच्या साम्राज्यांतच आहात; इथेंही लहान मुलांसारखे रहा; सहजामधे रहा. तुमच्याकडून आणखी जास्त विशेष असे कांही मी मागत नाहीं. आपल्या प्रेमशक्तीमधें परमात्म्याचा प्रकाश आला की समस्त जग बदलायला वेळ लागणार नाहीं. त्याची प्रचीति पाहून तुम्हीच आश्चर्य चकित व्हाल. मला तो मार्ग दिसला आणि आज त्याला बहार येत आहे. मला खात्री आहे की तुम्ही सर्वांनी मनापासून मला साथ दिली तर सहजयोगातून प्रचंड कार्य घडून येईल.

मी जे कांही सांगितले त्याचा परत गेल्यावर गांभीर्याने विचार करा, त्याचबरोबर आत्मपरिक्षण करा आणि या जन्मांत आपण काय मिळवणार आहोत हे समजूतदारपणें लक्षांत घ्या; सहजयोगी म्हणून आपण काय करु शकतो याचे भान ठेवा. मग तुम्हाला काय करायला हवे हे जाणवेल आणि तुमच्याकडून खूप महान कार्य घडेल.

परमेश्वराचे तुम्हा सर्वांना अनंत आशीर्वाद





# शिवपूजा पुणे २००२ वृत्तांत (१५-१६-१७ मार्च)

गतवर्षीप्रमाणे पुण्याजवळील बालेवाडी येथील स्टेडियमच्या आवारांत शिवपूजा २००२ चा सोहळा उत्साहांत व चैतन्यमय वातावरणात पार पडला. पुणे केन्द्राकडून खूप मेहनत घेतली गेली. कार्यकर्ते व उपस्थित योग्यांना हा सोहळा सुखद स्मृति देणारा ठरला. सोहळ्याच्या तीन दिवसांच्या कार्यक्रमाची पूर्वतयारी शिवपूजेची अनाऊन्समेंट गणपतीपूळे सेमिनार मध्ये झाल्यापासूनच सुरु केली गेली. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात पुण्यामधे एक मीटींग घेण्यात आली. त्यानुसार साधारणपणे पुढील कमिट्या तयार करण्यात आल्या.प्रिंटींग कमिटी, किचन कमिटी, ट्रान्सपोर्ट कमिटी, प्रसाद डिस्ट्रीब्युशन कमिटी, स्टेइंग कमिटी, रजिस्ट्रेशन कमिटी, डेकोरेशन कमिटी, फॉरेनर्स एअरपोर्ट /स्टेशन रिसीव्हींग कमिटी, स्टेज डेकोरेशन कमिटी, सिक्युरिटी कमिटी, स्टोअर कमिटी, मुझिक कमिटी, स्वच्छता कमिटी, फुले खरेदी वपुजा तयारी कमिटी, फोटोग्राफी/व्हिडीअओग्राफी कमिटी, बॅनर फिक्सींग कमिटी, मांडव व पेंडॉल फिक्सीग कमिटी, इलेक्टीक डेकोरेशन कमिटी, इत्यादी कमिट्या तयार करण्यात आल्या. त्यानुसार त्यांच्या वेळोवेळी मिटींग घेण्यात आल्या. सर्व कमिटीमेंबरर्सना कार्यक्रमापुर्वी २-३ दिवसांपासून हजर रहाण्यास सांगीतले होते. जसजसा पुजेचा दिवस जवळ येऊ लागला तस तसे सर्वांची धावपळ वाढायला लागली. सर्व कमिट्यावर पुण्यातील तसेच संपुर्ण भारतातील अनेक सहजयोग्यांनी स्वत:हुन आपला सहभा ग घेतला होता. विषेशकरुन कलकत्ता, झारखंड, गुजराथ, राजस्थान दिल्ली व महाराष्ट्रतील सहजयोग्यांनी सहभाग घेतला होता.पुजा सोहळा भारत, ऑस्ट्रेलिया व इंग्लंड, पुणे सहजयोग केंद्र यांच्या सामूहिक मार्गदर्शनात पार पडला.

१५ मार्च २००२

स्टेडीयम दिनांक १२ मार्चला आपल्या ताब्यात घेण्यात आले. सकाळपासूनच सहजयोग्यांचे आगमन सुरु झाले. साधारण आदल्या दिवशी बरेचशे सहजयोगी जमले होते.

सकाळची सुरुवात

सकाळी ६.३० वा. सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर सकाळच्या न्याहरी नंतर परत पेंडॉलमध्ये ११.००च्या सुमारास सर्वजण जमले. त्यावेळी श्री. सिंपल, श्री. अरुण आपटे व इतर यांनी सहजयोगातील अनेक प्रसिद्ध भजने म्हटली. दुपारी १.३० च्या सुमारास कार्यक्रम संपला.

संध्याकाळी ६.३० वाजल्यापासून स्टेडियमकडे येणारे रस्ते सहजयोग्यांनी भरले होते. रात्री ८च्या सुमारास श्री पुगालिया यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व श्री अरुण आपटे यांना संगीत कार्यक्रमाची सूत्रे स्वीकारण्यास सांगितले. श्री अरुण आपटे यांनी सुरवात स्वत: ' उमा उमा शिव शंकर हे भजन म्हटले' सौ. आपटे यांनी ' आजी सोनियाचा दिन आला' , 'जय शारदेदेवी बागेश्वरी' ही भजने म्हटली. श्री सुब्रमण्यम यांनी जय शंकरा गौरी हरा, कैसे गुण गाऊ, नॉयडा गृपने डम डम डम डमरु बजे, डॉ राजेशने भजले ओम नमो शिव नाम; दिपक वर्मा यांनी जय भोला भंडारी शिवहर, गुंजे सदा जयकार श्री माजीके भवर में, करुणामयी मॉ आपका हमको सदा आधार हा; सिंप्पल यांनी शिव शंकर दयाळू सुंदर है नाम प्यारा सारे जहा, शंकर तेरी जटामे बहती है गंगाधारा, शिवशंकर रखवाला मेरा शिवशंकर





रखवाला, हे निर्मल माँ हे निर्मल मा;, राहूल कुलकर्णी यांनी, 'वंदन करु या माताजींना महाशक्तिला सहजयोगीनींना' ही गाणी श्रीमाताजींच्या आगमनापूर्वी सादर केली.

रात्री १०.२० च्या सुमारास आदिशक्तिचे आगमन झाले. त्यावेळी कलकत्याचे वादकांनी वादन केले. नंतर आर्मीच्या बॅन्ड पथकाने बिगुल वाजवले. आदिशक्तिच्या स्टेजवरिल आगमनाच्या वेळी आर्मीचा बॅन्डने वेगळ्याच प्रकारच्या तालात वादन केले.



आपल्या शिव-पूजा सोहळ्याच्या प्रास्ताविक भाषणांत पुणें केंद्रप्रमुख श्री पुगालिया प.पू. श्रीमाताजींचे सर्व सहजयोग्यांतर्फे आदरपूर्वक स्वागत करुन म्हणाले, ''आजपर्यंत समस्त मानवप्राण्यांना कधींही प्राप्त होऊ न शकलेला आत्मसाक्षात्कार या कलियुगांत प्राप्त करुन दिलात याबद्दल आम्ही आपले ऋणी आहोंत.आपल्या आशीर्वादांत या अद्वितीय अनुभूतीमधून आपल्या साम्राज्यांत प्रस्थापित होण्याची आमची इच्छा व प्रयत्न फलद्रूप होऊ देत व आम्हाला चिदानंद स्थिति मिळू दे अशी आम्ही नम्र प्रार्थना करतो.''



त्यानंतर सोहळ्याच्या उद्घाटन-पूर्वक भाषणात श्री. राजेश शहा म्हणाले, ''इथे वेगवेगळ्या ठिकाणांहून व परदेशांतून आलेल्या सर्व सहजयोगी बंधू-भगिनींतर्फे मी आपले स्वागत करतो. या आनंददायक तीन दिवसांच्या सोहळ्यासाठी उपस्थित राहून आपल्या चरणी अर्पण करण्यात येणाऱ्या शिवपूजेचा स्वीकार करण्यास आपण संमति दिल्याबद्दल आम्ही आपले शतशः ऋणी आहोत. या पूजेमधून आम्हाला शिवतत्त्वाच्या गहनतेत उतरण्याची अपूर्व संधि मिळत आहे. पाठोपाठ दिल्ली येथें आपला वाढदिवस साजरा करण्यासही आपण संमति दिली आहे म्हणून आमचा आनंद द्विगुणीत झाला आहे. आमच्यावरचे आपले हे उपकार व्यक्त करण्यासाठी आम्ही काही संगीत-कला अत्यंत नम्रतापूर्वक व श्रध्दायुक्त अंतःकरणाने सादर करणार आहोत. आमचा हा प्रयत्न सूर्याला दिवा दाखवण्यासारखा किंवा महासागरात दोन-चार थेंब टाकण्यासारखा आहे. आपल्या दिव्य उपस्थितीत संपन्न होणाऱ्या या सोहळ्यामधून आमची गहनता प्रगल्भ होऊ दे आणि सामूहीक चेतनेमधे आम्हाला वृध्दिंगत होऊ दे''

त्यानंतर भारताचे लिडर श्री. नलगीरकर आपल्या स्वागतपूर्वक भाषणात म्हणाले



''सर्व उपस्थित सहजयोगी बंधू भगिनींचे हृदयपूर्वक स्वागत. कुण्डलीनीचे वास्तव्य असलेल्या महाराष्ट्रातच महाशिवरात्र पूजा स्वीकारण्यास प. पू. श्रीमाताजींनी संमति दिल्याबद्दल आम्ही अत्यंत भाग्यवान व ऋणी आहोत. मानवजन्माचे अंतिम साध्य शांति व समाधान हेच आहे हे श्रीमाताजींनी सांगितले आहेच व तीच वाटचाल सहजयोग्यानी करत राहून शिवतत्त्व साध्य करून घेण्याची शक्ती या शिवपूजेच्या चैतन्यामधून सर्वांना मिळावी अशी श्रीमाताजींच्या चरणी मी प्रार्थना करतो. आपण जगभरातील सहजयोगी जगाच्या एकूण लोकसंख्येच्या १% पेक्षाही कमीच आहोत. म्हणून अजून सहजयोगात न आलेल्या लोकांनाही आत्मसाक्षात्कार मिळवण्याची सुबुध्दि मिळू दे व त्यासाठी कार्य करण्याची इच्छा व शक्ति आपल्याला मिळू दे अशी श्रीमाताजींच्या चरणी प्रार्थना करू या. आपल्या अविरत प्रयत्नांमधूनच जगभर सहजयोग पसरवण्याचे श्री माताजींचे स्वप्न साकार होणार आहे.''



त्या नंतर जागतीक लीडर श्री -डेव्हिड स्पायरो आणि ऑस्ट्रेलियाचे लिडर श्री अविनाश यांनीही तसेच विचार व्यक्त करून



श्रीमाताजींचे आभार मानले व जगभरात शिवशक्ति जागृत होण्याच्या आड येणाऱ्या सहजयोग्यांमधील व बाहेरील लोकांमधील निगेटीव्हिटीचा नाश होऊ दे अशी प्रार्थना केली.
















anadevi


TRANSPORT















या प्रास्ताविका नंतर संगीत-कला कार्यक्रमास सुरवात झाली. कार्यक्रमाच्या सुरवातीला ऑस्ट्रेलियाच्या सहजयोग्यांनी एक नाटिका सादर केली. त्यामधे शिवाला पृथ्वीवरील सध्याच्या मानवांचा व्यसनी, व्याभिचारी प्रकारामुळे होणाऱ्या त्रासामुळे आदिशक्तिला जन्म घ्यावा लागला ही पार्श्वभूमि होती. त्यावेळी आदिशक्तिला शिवाने अनेक अस्त्रे प्रदान केली. त्यानंतर आदिशक्तिने सर्वांची कुडलिनी जागृत करुन त्यांना व्यसनापासून मुक्त केले. त्याचबरोबर मानवाची उत्क्रांती अमिबा पासून वेगवेगळ्या प्राण्यामधून शेवटी मानव म्हणून झाली. सदर समुह नाटकात ड्रेपरीत शंकर, आदिशक्ती, लहान मुले व इतर कलाकार अशा ४०-४५ जणांनी भाग घेतला. कथानक आकर्शक व लकात्मक पध्दतीने बसवले होते. प्रसंगानुसार त्यामधे सहजयोगातील प्रसिध्द गाण्यांची कडव्यांचा उपयोग केलेला होता. हा कार्यक्रम अत्यंत बहारदारपणे साधारण तास भर रंगला

रात्री ११.३० च्या सुमारास हैद्राबादचे प्रसिध्द कव्वाल श्री नासिम-वासिम अली आणि पार्टीचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी त्यांच्या आकर्षक शैलीत -हिंदू समजते है मंदिरमे कुछ है, मुस्लिम समजते है कि मस्जिदमे कुछ है, दोनोही गलत है. हम तो ये समझते है की श्रीमाताजी निर्मलादेवीमे सब कुछ है. - या शेरने कार्यक्रमाची सुरवात केली. त्यांनी - हर मेहरको देखा बाबा, बनगये मॉ के पुजारी, माताजी कुछ ऐसा रंगना, हम है माताके बालक फिर डर काहेका अशा एकाहून एक बहारदार कव्वाल्या सादर केल्या. त्यावेळी स्टेजसमोर चादर पसरली होती. सदर कार्यक्रम चैतन्यमय झाला. रात्री १.३० च्या सुमारास कार्यक्रम संपला.

१६ मार्च २००२

आजच्या कार्यक्रमाची सुरवात सकाळच्या ६.३० च्या सामुहिक ध्यानाने झाली. त्यानंतर दुपारी ११.०० श्री अरुण आपटे यांच्या मार्गदर्शनात संगीत कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यावेळी डॉ राजेश, सुब्रमण्यम, तसेच झारखंड चा अनपढ कबीराची भजने सादर करणारे व स्वत: श्री अरुण आपटे यांनी अनेक सुंदर भजने म्हटली दुपारचे १.३० कधी वाजले ते लक्षातच आलें नाही.

संध्याकाळी ७.३० च्या सुमारास कार्यक्रमाची सुरवात श्री अरुण आपटे व सौ आपटे यांच्या उमा उमा शंकरा या गाण्याने झाली. त्यानंतर नॉयडा ग्रुपने भोले बाबा चले कैलास, डॉ राजेश यांनी तेरे सहजी फुकार रहे आज आवो मेरी निर्मल मॉ, अंधकारसे निकले माता, श्री जगदंबे आइरे मेरी निर्मल मॉ ही भजने म्हटली.

आदिशक्तिचे साधारण १० च्या सुमारासे आगमन झाले. त्यावेळी कालच्याप्रमाणेच त्यांचे बिगुल व ढोलक वाजवून व स्टेजवर आगमन होताना बॅन्डच्या धुनीत स्वागत झाले. त्यांच्यासोबत आजही पापाजी होते. सुरवातीला पुणे युवाशक्तिचे श्री बागडदे व सहकारी कव्वाली गाण्यासाठी स्टेजवर जमले. त्यांनी सबके दिलमे बसी है मेरी माता निर्मला, ये मेरी माता का करम ह्या कव्वाली म्हटल्या. सदर कार्यक्रम अत्यंत सुंदर झाला. कार्यक्रम संपला त्यावेळी सर्वांनी उभे राहून प्रचंड टाळ्यांच्या गजरात आनंद व्यक्त केला. त्या वेळी श्री श्रीवास्तवसाहेव यांनी स्वत: माईकवरुन सांगितले की माझ्या आयष्यातला सर्वात चांगला असा हा कव्वालीचा कार्यक्रम झाला. तसेच त्याचवेळी श्री नलगीरकर यांना श्री बागडदे आणि पार्टी यांनी दिल्लीच्या वाढदिवस कार्यक्रमास उपस्थित रहाण्याचे निमंत्रण दिले.

त्यानंतर हैद्राबादचे प्रसिध्द पेरणी ग्रुपच्या पाच पुरुषांनी नृत्याचे प्रकार सादर केले. त्यामधे प्रामुख्याने शिव नृत्य, ओंकार नाद, पंच तत्व, समिकरणम व शेवटी त्यांची स्पेशालीटी असलेले ताल नृत्य सादर करुन सर्वांची वाहवा मिळवीली. सदर संस्था अशा प्रकारचे नृत्य सादर करणारी जगातील एकमेव संस्था आहे, गेल्या तीन वर्षापासून त्यांना पुण्याला आमंत्रित केले जाते.

मध्यरात्रीच्या सुमारास जगप्रसिध्द किराणा घराण्याच्या सहजयोगी गाईका श्रीमती मीना फातरपेकर स्टेजवर गायला बसल्या. सोबत हार्मोनियमवर श्री प्रमोद मराठे व तबल्यावर श्री मुकुंद मराठे यांनी साथ केली. त्यांनी सुरवातीला राग चंद्रकंस म्हटला त्याचे बोल बन के कन्नैया मै तो साज शिंगार असे होते. सदर गायनाने सर्व श्रोते वर्ग मंत्र मुग्ध झाला होता. त्यानंतर त्यांनी हासत आली निर्मल आई घालुनी पैजण पाइ हे भजन सादर केले शेवटी भैरवी मधे त्यांनी वैकुंठीच्या राजा हे गीत सादर करुन कार्यक्रमाची सांगता केली. मध्यंतरी सहजयोगी गायक श्री सिंपल यांची शिव भजन ही ऑडिओ कॅसेट एच. एम.व्ही. कंपनीने भारत भर वितरीत केल्याचे जाहिर केले. रात्री २.३० च्या सुमारास कार्यक्रम संपला.





१७ मार्च २००२

आजचा पुजेच्या दिवसाची सुरवात सकाळच्या ६.३० वा सामुहिक ध्यानाने झाली. आज सकाळपासूनच पुजेची तयारी सर्वत्र चालू होती. एकीकडे प्रसादाची तयारी म्हणुन कुंकवाचे आकर्षक पितळी करंडे व्हायब्रेटेड कुंकु भरण्याच्या तयारीत ठेवले होते. तसेच आदिशक्तीचे चरणाचे तीर्थ देण्यासाठी लहान लहान बाटल्या ठेवल्या होत्या. तसेच प्रसादाचे फुटाणे ,पुढे गेरु सर्व एका आकर्षक शिवपूजा लिहीलेल्या पिशवीत देण्याची पूर्व तयारी चालू होती. दुसरीकडे ४०-५० महिला फुलांच्या माळा तयार करण्याचे काम करीत होत्या. बाहेरच्या बाजूला रांगोळ्या काढण्याचे काम चालू होते.

रात्री ९.४५ च्या सुमारास आदिशक्तिचे तुतारीच्या आवाजात आगमन झाले. त्याचवेळी स्टेजवर सनईची मंगल धून वाजविण्यात येत होती. त्यानंतर आदिशक्तीने सर्वाना अमृतवाणी मधे संदेश दिला. त्याचा स्वतंत्र तपशील इतरत्र दिलेला आहे. त्यानंतर श्रीमाताजींची गौरी पूजा सुरु झाली. पूजेमधे सुरवातीला ऑस्ट्रेलियाच्या सहजयोग्यांनी शंकर भोले भाले, बोलो शिव शिव शंभू बम बम बम, ही भजने सादर केली. सुब्रमन्यम यांनी शिवो ओम शिवो ओम ,नॉयडा गृपने भोले बाबा चले कैलास, श्री बागडदे यांनी सदा शिवाय नमोस्तुते, सिंप्पल यांनी शिवोहं शिवोहं अशी भजने सादर केली.त्याच वेळी आदिशक्तीची गौरी रुपातील पूजा संपन्न झाली. सर्वांनी आदिशक्तीचे दर्शन घेतले. त्यानंतर आदिशक्तीला शिवरुपातील साज चढविण्यात आला. पूजेची जबाबदारी श्री नलगीरकर व श्री पुगालीया यांनी पार पाडली. शिवपूजेमधे दिपक वर्मा यांनी जय भोला भंडारी सिंप्पल यांनी शिव बोला साधू बोला, शंकर तेरी जटामे बहती है गंगाधारा ही भजने झाली. त्यानंतर श्री माताजींचे शिवरुपात सर्वांना दर्शन झाले.सर्व नॅशनल लिडरांनी आदिशक्तिची महाआरती केली.

त्यानंतर (इंटरनॅशनल गीफ्ट) श्री अविनाश, विडो, डेव्हिस, राजेश शहा व श्री नलगीरकर यांनी श्रीमाताजींना अर्पण केले.नॅशनल गीफ्ट भारत,ऑस्ट्रेलिया व युनायटेड किंगडम यांनी एकत्र नॅशनल गीफ्ट दिले, महाराष्ट्र तर्फे श्री पुगालिया, श्री हरी जलान व श्री शुक्ल यांनी पैठणी साडी व संगणक दिला.त्यानंतर वेगवेगळ्या देशांच्या सहजयोगी प्रतिनीधींनी श्री माताजींना गीफ्ट दिले. सदर कार्यक्रमाचे संयोजन श्री पुगालिया व श्री नलगीरकर यांनी केले.सदर कार्यक्रम चालू असताना सिंप्पल, दिपक वर्मा,सुब्रमन्यम व ऑस्ट्रेलियातील

सहजयोग्यांनी काही भजने सादर केली. रात्री साधारण ३.३० च्या सुमारास सदर कार्यक्रम संपला.

श्री माताजींनी जातीने सौ गडकरी, सौ जलान, सौ पुगालिया यांन गिफ्ट दिली. तसेच काहीजणांना गळ्यातील पेंडॉल श्रीमाताजींसमोर श्री पुगालिया यांनी दिले. पुजा साधारण ४.०० च्या सुमारास पुजेची सांगता झाली.

यंदा प्रसाद वाटपासाठी शिव पूजा असे लिहीलेल्या कागदी पिशव्यामधे पितळी करंड्यात कुंकू, बाटलीत तिर्थ, गेरु, फुटाणे, पेढे असे एकत्र प्रसाद देण्याची व्यवस्था केलेली होती.तसेच शिवाचा प्रसाद असलेला घोटा (अटीव दुध )वाटणात येत होते.

डेकोरेशन - यंदा स्टेज व इतर डेकोरेशनचे काम पुण्याचे श्री साप्ते व सहकारी यांनी पाहिले. मुख्य स्टेजवर हिमालयाच्या शिखरांवर अत्यंत आकर्षक विधृतप्रकाशात बारा ज्योतीर्लिंगे दाखविली होती. तसेच प्रत्येक ज्योतीर्लिंगाच्या मागच्या बाजुला श्रीशेषनागाचा डोलणारा फणा दाखविला होता. सदर फणा प्रत्यक्षात हालत असल्याने देखाव्यात जिवंतपणा वाटत होता. तसेच स्टेजकडे जाण्याच्या प्रवेशद्वारावर रोज दोन वेगवेगळ्या पेहरावातील द्वारपाल ठेवले होते. त्यांना पहिल्यादिवशी महाराष्ट्रीयन मावळा, दुसऱ्या दिवशी राजस्थानी द्वारपाल व शेवटच्या दिवशी गुजराथी द्वारपाल असा पेहराव केला होता. स्टेजच्या आतील श्रीमाताजींच्या मार्गावर फुलांचे अत्यंत भव्य डेकोरेशन केले होते. त्यात कलकत्याच्या कलाकारांनी खास कलकत्त्यच्या कागदापासून केलेले केळीचे खुंट आतील बाजूस उभे केले होते. सदर खंट प्रत्यक्षात खरे भासत होते. आदिशक्तीने जातीने याबाबत चौकशी केली.आदिशक्ती येण्याच्या गेटवर नागांच्या प्रतिमांची भव्य कमान उभारली होती.रोज आदिशक्तीच्या गाडीसोबत फेटे घातलेले पायलट मागेपुढे असत.

यावर्षी एकुण ८३३२ सहजयोगी उपस्थित होते. त्यापैकी ५७७ परदेशी होते. तसेच २०९५ युवाशक्ति होते. जेवणाची व्यवस्था अत्यंत सुदर होती.परदेशी सहजयोग्यांनी जेवणाबावत विषेश कौतुक केले होते.





# वनदेवी आयुर्वेदिक हर्बल प्रॉडक्टस प्रा. लि.

प.पू. श्रीमाताजींच्या प्रेरणेनें व पुढाकाराने पुण्याजवळ पिरंगुटच्या परिसरांत आयुर्वेदिक वनौषधे निर्माण करण्याच्या प्रकल्पाचा उदघाटन समारंभ श्रीमाताजींच्या हस्ते १४ मार्च २००२ रोजी संपन्न झाला. समारंभाची सर्व तयारी आटोपशीर व उत्साहपूर्वक करण्यांत आली होती. सर्व सहजयोगी शांतपणें व आदराने स्वागतासाठी आवारात दुतर्फी उभे होते. सायंकाळी सातच्या प्रशांत वेळी श्रीमाताजींचे आगमन झाले; केंद्र प्रमुख श्री पुगालिया व सौ गडकरी यांनी - आगत स्वागत स्वागतम- या भजनाबरोबर त्यांचे यथोचित स्वागत केले. आसनस्थ झालेली साक्षात वनदेवीच आपल्या समोर असल्यासारखी भावना सर्व सहजयोग्यांना हृदयांत जाणवली.

श्रीमाताजींना पुष्पहार व सर सी.पी. साहेबांना पुष्पगुच्छ अर्पण करण्यात आल्यावर आपल्या छोट्याशा भाषणांत श्रीमाताजी म्हणाल्या-

''आपल्याकडे आयुर्वेदाचे ज्ञान फार पूर्वीपासून आलेले आहे. सहजयोगांत औषध वापरण्यापेक्षा आपण सहज- ट्रीटमेंटवरच जास्त भर दिला आहे. पण मी जेव्हां आयुर्वेदासंबंधी कांही तज्ञांजवळ चर्चा केली तेव्हा आपल्या देशांत हिमालयमधेही काय काय औषधी जड-बूटि आहेत व त्यांची जाण किती दुर्मिळ लोकांना आहे हे समजले; त्यांचा औषधी उपचार किती प्रभावी आहे व खर्च किती कमी आहे हे लक्षात आल्यावर सहजयोग्यांसाठी त्याचा उपयोग करण्याचा विचार माझ्या मनात आला. विशेषत: परदेशातील योग्यांसाठी ही औषधे जास्त जरुर आहेत असेही मला वाटले. म्हणून सुरुवातीला प्रतिष्ठानमधेच ही औषधे तयार करण्याची व्यवस्था केली होती; पण त्याचा वापर व व्याप जसा वाढत गेला तशी कांही वेगळी व्यवस्था करण्याची गरज भासू लागली. सुदैवाने सर्व व्यवस्थित जमून आले व पुण्याजवळच मी पुर्वी पाहिलेल्या जागेजवळ हा कारखाना फार थोड्या कालावधींत उभा राहिला. इथे शरीरात घेण्याची औषधे व शरीराला बाहेरुन लावण्याची आयुर्वेदिक औषधे तयार होणार आहेत.या औषधांना साइड-इफेक्टस नसतात, तसेच बाजाराच्या मानाने ती कमी दरांत मिळतील. डायबेटीसवरही इथें प्रभावी औषध उपलब्ध होणार आहे. सर्वात कमी वेळात सदर कारखान्याची वास्तु उभी राहिली तसेच इथल्या कार्यकर्त्यांनी केलेल्या मेहनतीबद्दल मला त्यांचे कौतुक वाटते.सर्व सहजयोग्यानी या औषधांचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. या प्रकल्पास माझे अनेक अशिर्वाद''

त्यानंतर सौ सुरेखा आपटे यांनी म्हटलेल्या 'औम नमोजी आद्या' या प्रार्थनास्तोने सांगीतिक कार्यक्रम सुरु झाला; त्यापाठोपाठ त्यांनी आज सोनियाच्या दिवस अमृताचा ठेवा हे भजन सादर केले. कुमारी वर्षा कळंबटेने - जय शारदे बागेश्वरी व मागे उभा मंगेश पुढे उभा मंगेश- या दोन गीतांसोबत भरतनाट्य नृत्य सादर केले. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणाची पूजा केली गेली व सोबत -पूजनका अधिकार दिजीये- व हासत आली निर्मल आई- ही भजने झाली. शेवटी श्री राजीव बागडदे यांनी -पशुपत गिरिजात शंकरा- हे बसंत बहार रागांतील भजन सादर केले.

कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमाताजींनी प्रकल्पांत कार्य करणाऱ्याना भेट व आशीर्वाद दिल्यावर सायं ८.३०च्या सुमारास कार्यक्रमाचा समारोह संपन्न झाला.७

●●●







दहा गुरूंची अवतरणे

# सॉक्रेटिस

प्राचीन समृध्द ग्रीक साम्राज्यातील अथेन्समधे इ.सन.पूर्व ४६९ मधें जन्मलेल्या सॉक्रेटिसचे नांव आजही एक असामान्य तत्त्वज्ञ आणि विचारवंत म्हणून आदरानें सन्मानपूर्वक घेतले जाते. त्यांचे वडील शिल्पकार होते व आई परिचारिका होती. सॉक्रेटिस स्वत:ही शिल्पकला शिकला पण त्या उद्योगांत त्याला रस नव्हता.

दिसायला कुरुप, बसक्या नाकाचा, बेढब शरीरयष्टीचा व बटबटीत डोळ्यांचा, कांहीही उद्योग न करणारा पण खूप बडबड करणारा असे ज्याचे वर्णन केले त्या सॉक्रेटिसने जन्मभरांत एक अक्षरही कागदावर लिहिले नाहीं. उलट तो सतत गप्पा मारत असे. या त्याच्या गप्पा कुठेही, कधीही कुणाबरोबरही होत असत; त्यांत विद्यार्थी, तरुण, विद्वान, शिक्षक, डॉक्टर, कारागीर, मजूर अशा अनेक स्तरांतील मंडळी असत आणि मैत्री नीतिमत्ता, शिक्षण, युध्द, समाज, राजकारण, प्रेम, धर्म, मृत्यू अशा अनेक विषयांवर त्यांच्या चर्चा चालत. त्याची अशी खास पध्दत म्हणजे तो स्वत;च प्रश्न विचारुन ऐकणऱ्याला विचार करण्यास प्रवृत्त करत असे व उत्तर शोधण्यास दिशा दाखवत असे. सत्यान्वेषणासाठीं स्वत:लाच प्रश्न करून स्वत;च उत्तर शोधणे अशी ही पध्दत. मानवी इतिहासाच्या सुदैवाने त्याच्याबरोबरच्या कांही शिष्यांनी -त्यांत मुख्य प्लेटो होता- ह्या सर्व चर्चा लिहून ठेवल्या व ग्रंथरुपांत प्रसिध्द केल्या. त्यावरुनच आज सॉक्रेटिसचे तत्त्वज्ञान, त्याचे सिध्दांत, मते, जीवनविषयक दृष्टिकोन, जन्म-मृत्यू व मानवी जीवनाचा हेतू, शासन व्यवस्था, शिक्षण पध्दति इ. विविधांगी चर्चांमधून त्याचा मोठेपणा दिसून येतो. आयुष्यभर बोलत राहिला आणि जगांतील सर्वांत शहाणा ठरला असे त्याचे वर्णन म्हणूनच खरे ठरते.

सॉक्रेटिसच्या उपदेशांचा व तत्त्वज्ञानाचा मूलभूत विचार असा की माणूस चुका करतो त्या जाणूनबुजून करत नसतो तर योग्य कर्म कोणते हे न समजण्याच्या अज्ञानामुळे तो चुकीच्या गोष्टी करतो.'*मला एवढेंच माहित आहे की मला कांहींच माहीत नाहीं*' अशा शब्दांत तो स्वत:बद्दल सांगत असे यावरुनच त्याचे शहाणपण लक्षांत येते. माणसामधील सद्गुणांचा त्याचा असा एक मापदंड होता; त्याच्या खालच्या टोकाला भौतिक चांगुलपणा((श्रीमंती, घरदार,ऐश्वर्य)मधल्या जागीं देहिक संपत्ति(रुप, सामर्थ, आरोग्य, बुध्दि); तर वरच्या टोकाला आत्मिक चांगुलपणा (आत्मकल्याण, सुबुध्दि,नीतिमत्ता) असा हा मापदंड होता. यातून त्याचे जीवनमूल्य दिसून येते की स्वत: अन्याय न करतानाहीं दुसऱ्याने केलेल्या अन्याय त्रास झाला तरी भोगणें श्रेयस्कर असते.



अथेन्ससारख्या समृध्द स्थानी असूनही सॉक्रेटिसचे वैयक्तिक व कौटुंबिक जीवन गरीबीत व हलाखीतच गेले. अंगावर कोट न घालता अनवाणी पायाने गबाळ्या वेषांत, उन-पाऊस-थंडीची पर्वा नसल्यासारखा तो कुठेही हिंडत असे वा एखाद्या ठिकाणी तासन-तास विचारांत हरवल्यासारखा उभा असे. भौतिक किंवा प्रापंचिक कसलीही जरुरी नसल्यासारखी त्याची रहाणी होती. त्याच्या कांही शिष्यांनी मात्र त्याची वैचारिक श्रीमंती व मूलभूत नितीमत्तेबद्दलचा आदर जाणला होता व त्याचा पूर्ण सन्मानानें आदर ठेवला होता.

सॉक्रेटिसला असत्य, अप्रामाणिकपणा व ढोंगीपणा यांच्याबद्दल चीड होती. त्याच्या उपदेशात्मक चर्चामधून तो परखडपणें बोलत असे. त्यामुळे प्रस्थापित सरदार व तथाकथित पुढाऱ्यांचा रोष त्याने ओढून घेतला. सरतेशेवटी सूडभावनेने प्रेरित होऊन या मंडळींनी त्याच्यावर खटला भरला; तरुण वर्गाला चिथावणें, देवावर अविश्वास दाखवून अंधश्रध्दा निर्माण करणें, स्पष्ट विचारांनी मुलांना बिघडवणे. इ. आरोप सॉक्रेटिसवर ठेवण्यात आले. न्यायपध्दतीचा अनादर न करतां त्याने खटल्याला समर्थपणे तोंड दिले. 'Apology' या ग्रंथांत त्याने केलेल्या बचावात्मक उत्तरांचे संदर्भ आहेत. अपेक्षेप्रमाणे खटल्याचा निकाल त्याच्या विरोघात गेला. इ.पू.३९९ मधे वयाच्या ७० व्या वर्षी तुरुंगांत त्याला विषप्राशनाची शिक्षा दिली गेली आणि शांतपणे तो मृत्यूला सामोरा गेला.

## सॉक्रेटिसचे कांही विचार :

- जोपर्यंत आपण देहभान बाळगून असतो तोपर्यंत आत्मभाव प्रदूषित असल्यामुळें निखळ सत्य आपण जाणूं शकत नाहीं.
- देहभावामुळें वासनापूर्तीसाठी आपल चित्त इंद्रियांमधून सतत बाहेर खेचले जाते व आकर्षण, लालसा, भय, असुरक्षा इ. अनेक प्रवृत्तींचा प्रभाव वाढतो आणि खऱ्या अर्थानें आपण विचार असा करुं शकत नाहीं.आपल्या आत्मशोधनाच्या प्रयत्नामधें हेच खूप मोठे अडथळे असतात.
- युध्द, बंड, चळवळ इ. सर्व प्रश्न फक्त देहभावच बळावल्यामुळें अर्थकारणातून वाढीस लागतात; त्याच्या मुळाशी देहाचे गुलाम या नात्याचा आपला व्यवहार असतो.
- माणसाने आत्म्यावर प्रेम करावे. त्याची काळजी व जोपासना करावी आणि तो परमात्मा बनेल अशा वृत्तीने रहावे.
- चालाख भाष्य करणारा आसा अरोप माझ्यावर ठेवण्यांत आला आहे. याचा अर्थच असा होत तर नाही का की सत्य परखडपणे सांगणारा चालाख असतो?(न्यायालयांतील स्पष्टीकरण)
- अज्ञानी आणि अप्रकाशित (uninitiated and unenlightened) अवस्थांत पुनर्जन्म मिळालेला जीव हालात जगतो तर शुध्द व प्रकाशित जीव देवांचे सान्निध्यांत येतो.

●●●





# अमृत वाणी

## कुंडलिनी

परमेश्वराची इच्छा किंवा त्याची इच्छाशक्ती ही आपल्या डाव्या नाडीतून वाहात असते. त्या इच्छाशक्तिचा थोडासा भाग कुंडलिनी आहे. म्हणजेच परमेश्वराने आपली स्वत:ची इच्छाच आपल्यामध्ये या त्रिकोणाकार अस्थीमध्ये ठेवली आहे. मनुष्याचा पिंड तयार झाल्यावर जीवाला पुरवण्यांत आलेली ही शक्ती आहे. म्हणून इंगजीमध्ये तीला रेसिड्यूअल एनर्जी असे म्हणतात. पण ही शुध्द शक्ती आहे तसेच ही शुध्द इच्छाशक्ती सुध्दा आहे. ही इच्छा संपूर्ण परमेश्वराची इच्छा असल्यामुळे तिच्यात आपल्या कोणत्याही इच्छेचा परिणाम न झाल्यामुळे ती अत्यंत शुध्द आहे आणि त्या शुध्दतेत ती बसली आहे. ती त्रिकोणाकार अस्थिमधिल शक्ती जी बाहेरुन त्रिकोणाकार दिसते. परंतु आतून ती साडेतीन वेटोळे घालून कां आहे त्याचे मोठे गणित आहे.

तुमची कुंडलिनी सहज जागृत झाली केवळ तुमच्या आईच्या प्रेमामुळे करुणेमुळे हीच करुणा हेच प्रेम तुमच्या कुंडलिनी शक्तीचे पोषण करणार आहे.

तुम्ही शक्तीमान आहात, भित्रे व्हाल तर तुमची कुंडलिनी वर जाणार नाही, जे लोक भित्रे आहेत त्यांची कुंडलिनी वर चढत नाही. खरा सहजयोगी कशालाच भीत नाही. कारण त्याला ठाऊक आहे की गण व देवदूत त्यांचेबरोबर आहेत. ही भिती दूर गेली की तुमच्यातील कपट कावेबाज वृती व द्वेषबुध्दी निघून जाईल या सर्वांमुळे कुंडलिनीचे उत्थापन व्यवस्थित होईल.

दुसरे महत्वाचे कुंडलिनीला अडथळा येणाचे कारण तुमचा -अहंकार - हा भयंकर आहे. तुम्ही जर ख्रिस्तांचे अनुकरण करता तर तुमच्यात अहंकार कसा येतो? क्षमा वृत्ती सहज यावी. रागाचा लवलेशही नसावा कारण तुम्ही शक्तीमान आहात.

कुंडलिनी ही निर्व्याज आहे. ती कसली भरपाई मागत नाही. करुणामय, मुलायम असा आपल्या निर्मिलेल्या या प्रेमाचा (कुंडलिनीचा) झरा, ही आपली शक्ती तशीच वांहू द्या. कारण तिने दिलेला साक्षात्कार हा स्वत:च्या उध्दाराबरोबर सर्व जगाकरिता आहे.



जेव्हां सहस्त्रार उघडते तेव्हां कुंडलिनी शक्तीचे उत्थापन होऊन दैवी शक्तीशी तिचा संयोग होतो आणि ती सदासर्वकाळ तुमच्यात प्रवाहित हाते, त्यामुळे तुम्हाला निर्विकल्प





आवस्था प्राप्त होते. ही दैवीशक्ती सहस्त्रारातून तुमच्यामध्ये येत असल्यामुळे प्रत्येकाने हे लक्षात घेतले पाहिजे की सहस्त्रार स्वच्छ असले पाहिजे. ज्यायोगे दैवी शक्तीचास्त्रोत कोठल्याही अडथळ्याशिवाय तुमच्यात प्रवेश करेल. मग अशाप्रकारे तुम्हाल संपूर्ण आत्मसाक्षात्कार मिळतो.

प्राचीन काळापासून भारतात लोकांनी कुंडलिनी विषयी सांगितले की, कुंडलिनी आपल्यामधील आदिशक्तीचे प्रतिबिंब आहे. प्रत्येकामध्ये तिचे वास्तव्य आहे. तेव्हां ही आदिशक्ती शुध्द प्रेम, करुणामय अशी शक्ती आहे हे जाणले पाहिजे. तिच्या अंतकरणात शुध्द प्रेमाशिवाय काही नाही व ते पवित्र प्रेम फार प्रबल आहे.

तुम्हा सर्वामध्ये या शक्त्या आहेत. कुंडलिनी ही फार भयानक गोष्ट आहे असं वर्णन करणारी पुस्तके आहेत. ते पूर्णपणे निरर्थक आहे. मी अनेक देशांत गेले आहे आणि अनेक लोकांना साक्षात्कार दिला आहे. आणि त्यांना त्रास झाल्याचे कोणतेही चिन्ह नाही, त्याउलट प्रत्येक प्रकारे ते सुधारले आहेत. रात्रभरात लोकांनी ड्रग्ज, दारु, वाईट सवयी सोडून दिल्या. लोक रोगमुक्त झालेत. तुमची स्वत:ची कुंडलिनी ते कार्यान्वित करते.

कुंडलिनी तुमची आई आहे. तुमची एकुलती एक खरी आई आहे.आणि तीला तुमच्याबद्दल सारी माहिती आहे. ते सगळे तिच्यामध्ये मुद्रित झालेलं आहे. ती साडेतीन वेटोळ्यामध्ये तुमच्यामधे आहे. जेव्हां ती उत्थान पावते तेव्हां कदाचित ती थोडीशी उष्णता देईल, कारण तिला कराव्या लागणाऱ्या थोड्याशा धडपडीमुळे असे होते.

एकदा का ही कुंडलिनी उत्थान पावली की ती सह चक्रामधून जाते, टाळूच्या जागीए छेदन कर्त, हाच बाटिस्मा अर्थात द्विज होण्याचा खरा अविष्कार असतो. त्यानंतर हा आत्मा प्रकाश बनून आपल्या चित्तामध्ये येतो आणि आपल्या नसांना नवी जाणीव मिळते, ज्यामुळे आपण सामूहिक चेतनेमध्ये उतरतो.



आता ही कुंडलिनी आतापर्यंत प्रतिक्षेत होती आणि आरामस्थितीत होती, ती जागृत झाली आणि म्हणूनच सर्वत्र वसंत बहारला आहे. अशावेळी जागृत झालेली कुंडलिनी असा प्रकाश देईल की सर्व विश्वाला पूर्णत्व प्राप्त होईल.





# सहज समाचार

## विवाहदिवस स्मृति समारंभ

दिल्लीतील सहजअश्रमात ८ एप्रिल २००२ या दिवशी रात्री ११ च्या सुमारास कार्यक्रम मुख्य पेंडालमधे कार्यक्रम सुरु झाला. त्यापुर्वी भारताचे केंद्रिय गृहमंत्री श्री लालकृष्ण अडवानी यांनी श्रीमाताजींची प्रत्यक्ष भेट घतली. त्यावेळी श्री अडवानी व श्रीमाताजींनी रात्री ८.०० ते १०.३० पर्यत एकांतात चर्चा केली. इतर त्यावेळी कोणी हजर नव्हते.

त्यानंतर गोव्याचे प्रसिध्द शास्त्रीय संगीतकारांना सदर कार्यक्रमासाठी आमंत्रित केले होते. त्याच्या गायनाने सदर वातावरण अत्यंत चैतन्यमय झाले होते. सदर कार्यक्रमास ७०-८० सहजयोगी व पाहुणे उपस्थित होते. कार्यक्रम रात्री २.३० च्या सुमारास संपला.

## पुणे केंद्र

गुढिपाडवा

१३एप्रिल२००२

■ गुढीपाडव्याच्या मुहुर्तावर पुण्यातील भुसारी कॉलनीतील चंद्रगुप्त को. हाऊ. सोसा. याठिकाणी निर्मल इनफो सिस्टीम ॲन्ड टेक्नॉलॉजी प्रा. लि. या कंपनीचे उदघाटन झाले. सकाळी ११च्या सुमारास पूजा संपन्न झाली त्यानंतर भजने झाली. प्रसादाचे वाटप झाले. सदर कंपनीची जबाबदारी श्री आर.के.पुगालिया,श्री भटनागर श्री चेतन पाटिल व इतर युवाशक्ति काम पहाणार आहेत. तरी ज्या सहजयोग्यांना सदर कंपनीत स्वयंसेवक म्हणून काम करण्याची इच्छा आहे त्यांनी पुणे केंद्राशी संपर्क साधावा.



■ गुढीपाडव्याच्या दिवशी पुणे केंद्रातर्फे संध्याकाळी कव्वालीचा कार्यक्रम आयोजित केला होता. सदर कार्यक्रमास खास जातीने महाराष्ट्राचे लिडर श्री प्रधान व श्री सराफ़, मुंबईचे लिडर श्री हरी जलान साहेब, वनदेवी डायरेक्टर श्री पराग राजे तसेच मुंबईचे इतर अनेक सहजयोगी कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात पुण्याचे प्रसिध्द सनई वादक श्री तुकाराम दैठणकर यांच्या सनई वादनाने झाली. त्यांनी सुरवातीला एक मंगल राग सादर केला. त्यानंतर त्यांनी बोल पायल मैने राम लखन पायो, माझे माहेर पंढरी ही भजने अत्यंत सुंदरपणे सादर केली.कव्वालीची तयारी पूर्ण होईपर्यंतच्या काळात पुणे आश्रमातील स्वतंत्र जागेत चैतन्य लहरी या मराठी द्वैमासिकाच्या कार्यालयाचे तसेच युवादृष्टीच्या कार्यालयाचे श्री प्रधान व श्री सराफ यांच्या हस्ते फित कापून उदघाटन केले. तसेच नविन संगणकाचे उदघाटन केले.



त्यानंतर यावर्षी संपुर्ण भारतभर गाजलेले पुण्याचे श्री बागडदे व सहकारी यांनी श्री अरुण आपटेंच्या मार्गदर्शनात अनेक गाजलेल्या कव्वाल्या सादर केल्या. सुरवातीला मेरी माता का करम, या अली या अली शेवटी सबके दिलमे बसी मेरी माता निर्मला ह्या कव्वाल्या एकापाठोपाठ सादर केल्या.त्यावेळी सर्वांना नाचवले. शेवटी शिव पूजेत ज्यांनी काम केले त्यासर्व सहजयोग्यांचे श्री प्रधान व श्री जलान साहेबांच्या हस्ते प्रेझेंट देऊन अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी महाप्रसाद घेऊन कार्यक्रम संपला.

• सारस बागेतील प्रसिध्द गणपती मंदिराच्या आवारात दिनांक १एप्रिल व२एप्रिल २००२ रोजी संध्याकाळी प्रदर्शन व जागृतिचा





कार्यक्रम आयोजीत केला होता. त्यासा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

- पुण्यातील पेशवेकालिन प्रसिध्द पर्वती टेकडीवरील शिवालयाच्या परिसरातील रंगहॉल या ठिकाणी दिनांक ६ एप्रिल ते ८ एप्रिल २००२ या दिवशी दिवसभर सार्वजनिक आत्मसाक्षात्काराचा कार्यक्रम झाला.



- सिहगड जवळील डोणजे गावाजवळ निगडे गावात दिनांक ७.४.२००२ रोजी संध्याकाळी पब्लीक कार्यक्रम झाला. ३१ मार्च रोजी औसरे गावात झाला.
- धनकवडी मधिल चाटे क्लासेस मधे १९.४.२००२ रोजी व चैतन्यनगर मधे सध्याकाळी जागृतीचा कार्यक्रम झाला.
- पुणे विद्यापिठातील विद्यार्थी वसतीगृहामध्ये २८.४.२००२ रोजी स. १० ते १ या वेळात पब्लिक प्रोग्राम झाला.

पुणे परीसरात नविन दोन सेंटर्स सुरु झाली आहेत.

- महाळुंगे पाडळी, प्राथमिक स्कूल, दर मंगळवारी सं. ६:३० वा.
- मुकुंद नगर, झांबरे पॅलेस, दर मंगळवारी सं. ६:३० वा.

## अहमदनगर जिल्हा

अश्वी इंग्लीश स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय अश्वी बु. ता. संगमनेर या ठीकाणी १९ जानेवारी रोजी सदर शाळेतील सर्व विद्यार्थि व प्राध्यापकांसाठी सहजयोग ध्यानधारणा व आत्मसक्षात्काराचा कार्यक्रम आयोजीत केला होता. त्यावेळी सुमारे ११०० विद्यार्थी व प्राध्यापकांनी जागृती घेतली. या बाबत शाळेच्या मुख्याध्यापकांनी श्री. प्रा. महेन्द्र चव्हाण यांचे लेखी पत्र देऊन आभार मानले.

निर्मल धाम सहजयोग आश्रम आडगाव (ता. राहुरी) या ठिकाणी १० फेब्रुवारी रोजी सहजयोग प्रणित मोफत अरोग्य तपासणी आणि उपचार व त्याच बरोबर सहजयोग जागृतीचा कर्यक्रम आयोजीत केला होता. त्या साठी अजुबाजुच्या ११ गावातुन ३०० स्त्री-पुरूष उपस्थित होते. सदर कार्यक्रमा बाबत स्थानिक वर्तमान पत्रे गावकरी व सार्वमत या मध्ये बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या.

रविवार दि. २४ फेब्रुवारी रोजी अहमदनगर येथे पत्रकार परीषद घेण्यात आली. त्यावेळी आकाशवाणीच्या प्रतीनिधी सह जील्ह्यातील जवळ जवळ सर्व वर्तमान पत्राचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यावेळी त्यांना सहजयोग ध्यान धारणेची माहीती व आवश्यकता सांगितली तसेच त्यांना एक कार्यशाळा आयोजीत करण्याबाबत, त्यांच्या सर्व कुटुंबियांना बोलवण्याबाबत व सहजयोगाचा अत्मसाक्षातकार घेण्याबाबत आवाहन केले.

१० मार्च रोजी निर्मल धाम सहजयोग आश्रम आडगाव (ता. राहुरी) या ठिकाणी सहज वुमेन वेलफेअर सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने अळंबी उत्पादन व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजीत केले होते. त्यावेळी सुमारे ५० शेतकरी उपस्थित होते. त्यांना त्यानंतर जागृती देण्यात आली.

११ मार्च रोजी बारागाव नांदूर गावठाण, राजुरी येथे सहजयोग ध्यान केंद्राचे उद्घाटन झाले त्यावेळी सर्व उपस्थितांना आत्मसाक्षातकाराची अनुभुती दिली.

## उत्तरांचल सेमिनार

हरिद्वारपासून २० की. मी. अंतरावर असलेल्या राजाजी नॅशनल पार्कच्या घनदाट जंगलातील परीसरात वंदेमातरम कुंज या ठीकाणी सेमीनारचे दि. १२ ते १६ जून या कालावधीत सेमीनार आयोजीत केला आहे.

सेमिनारची वर्गणी रू. ८०० प्रौढांसाठी, रू. ५०० युवाशक्ती साठी अणि लहान मुलांसाठी रू. ३०० अशी ठेवलेली आहे. सेमीनार दि. १२ रोजी संध्याकाळी ४ वा. सुरू होऊन १६ रोजी सकाळच्या न्याहारी नंतर संपेल.

सेमीनार साठीचा बँक ड्राफ्ट लाईफ इटरनल ट्रस्ट यु. पी. पेयेबल अॅट हरिद्वार या नावाने २० मे पर्यंत पुढील पत्यावर पोहचेल असा पाठवावा.

जसपाल सिंह, उत्तरांचल सहजयोग केंद्र,
पंजाब-सिंध क्षेत्र, निर्मल बागे जवळ,
कनखल-हरीद्वार (उत्तरांचल)
फोन : ०१३३-४१२१२३, ४१६३३०
E-Mail : jagpalsy@hotmail.com





प. पू. श्री माताजी निर्मलादेवींच्या २००२ वर्षातील पुजांचे स्थळ व अंदाजे तारखा पुढील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| • सहस्त्रार पूजा | ३-५ मे २००२ | कबेला |
| • आदिशक्ती पूजा | २१-२३ जून २००२ | कबेला |
| • गुरू पूजा | १९-२१ जुलै २००२ | कबेला |
| • श्रीकृष्ण पूजा | १६-१८ ऑगस्ट २००२ | कानाजोहारी (अमेरीका) |
| • गणेश पूजा | १३-१५ सप्टेंबर२००२ | कबेला |
| • नवरात्री पूजा | ४-६ ऑक्टोबर २००२ | कबेला |
| • दिवाळी पूजा | १-३ नोव्हेंबर२००२ | लॉस एंजेलीस (अमेरीका) |
| • ख्रिसमस पूजा | २३-२९ डिसेंबर २००२ | गणपती पूळे |

श्री. माताजी निर्मला देवींनी एप्रिल २००२ दिल्ली वास्तव्यात भारतातील प्रत्येक राज्यासाठी पुढील तीन वर्षांसाठी सहजयोग प्रसार व प्रचार कार्यासाठी खालील सहजयोग्यांची नेमणूक केली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | महाराष्ट्र | श्री. अरूण प्रधान, श्री. मोहन सराफ |
| २) | मध्य प्रदेश | श्री. योगेश लोढा |
| ३) | उत्तरांचल | श्री. जगपाल सिंह |
| ४) | वेस्ट बेंगॉल | श्री. हिमांशू शहा |
| ५) | झारखंड | श्रीमती पुष्पा मोहता |
| ६) | गुजराथ | श्री. कौशिकभाई पंचाल |
| ७) | राजस्थान | श्री. भगवती सिंग, श्री. सुबोध भटनागर |
| ८) | बिहार | श्री. सी. एन. शर्मा |
| ९) | आंध्रप्रदेश | श्री. राममोहन राव |
| १०) | पंजाब | श्रीमती सुनिता मोहिंद्रा |
| ११) | छत्तीसगढ | श्री.राजीव ग्यानी |
| १२) | हरियाना | श्री.अशोक आगरवाल |
| १३) | हिमाचल प्रदेश/चंदिगढ | श्री. संजीव सोंढी |
| १४) | गोवा | श्री. दिलीप नलगीरकर |
| १५) | जम्मू काश्मिर | श्री. एन. सी. सांग्रा |
| १६) | आसाम | श्री. बी. कुंवर |
| १७) | तामिळनाडू | श्री. जी. एम. रेड्डी |
| १८) | उत्तरप्रदेश | श्री. ब्रिजेश कपूर |

सर श्री सी.पी.श्रीवास्तवसाहेब यांचे 'करप्शन' या इंग्रजी पुस्तकाचे मराठी अनुवादीत पुस्तक 'भ्रष्टाचार' या पुस्तकाचे उद्घाटन झाले. आता ते विक्रीसाठी उपलब्ध झाले असून सर्वांनी याची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी पुणे केंद्राशी संपर्क साधावा.



## नाशिक जिल्हा

**गुन्हा अन्वेशण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक या ठिकाणी शनिवार दि. ०९/०३/२००२ रोजी सहजयोगाचा पब्लिक प्रोग्राम झाला त्या बद्दल सदर संस्थेचे उपसंचालक श्री. आर. आर. माणगांवकर यांनी दिलेला अभिप्राय पुढील प्रमाणे.**

GOVERNMENT OF MAHARASHTRA

*Do. No.* 725/2002

*Office of the Deputy Director*
*Detective Training School, MPA Campus,*
*Nashik - 422 002*

*Dt.* 11 MAR 2002

प्रति,

श्री. एन.के.पंडीत,
सहजयोगी,
सहज याग ध्यान केंद्र,
कृषीनगर, नाशिक.

गुन्हा अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक येथे गुन्हा अन्वेषण प्रशिक्षण सत्र क्र.62 मधील 87 प्रशिक्षणार्थी व अधिकाऱ्यांना दिनांक 9.3.2002 शनिवार रोजी आमचे विनंतीला मान देऊन आपण व आपले सहकारीद्वय श्री. एम.जे.कुलकर्णी व श्री. व्ही.एम.काळे यांनी "सहज योग ध्यान" या विषयावर प्रात्यक्षिकासह उदबोधक व्याख्यान दिल्याबद्दल आम्ही अत्यंत आभारी आहोत.

आदरणीय माताजी निर्मलादेवी यांच्या सहजयोग ध्यानाव्दारे आपण सर्वांनी प्रशिक्षणार्थी व अधिकाऱ्यांना मनशांती कशी मिळवावी, शारिरीक स्वास्थ कसे टिकवावे, व्यक्तीमत्व संतुलन राखण्यासाठी ताणतणावापासुन सुटका कशी करावी व मनोबल कशारितीने वाढवावे याबद्दल दिलेले प्रात्यक्षिकासह उत्कृष्ट व्याख्यान सर्वांना मनापासून आवडले.

त्यासाठी आपण सर्वांनी मौलिक विचार मांडुन प्रत्येकाकडुन प्रत्यक्षिक करुन घेऊन मनशांतीचा अनुभव प्रत्ययाला आणून दाखविला. सहजयोग ध्यानाव्दारे साधना कशी करावी व त्यातुन मनशांती मिळविण्यासाठी, शरीराचे दोष विनासायास कसे घालविता येतात व तणावमुक्त होऊन आरोग्य चांगले राखल्यास मनुष्य मानसिक रोगापासुन मुक्त होऊन कर्तव्यासाठी उत्साहाने कार्यान्वीत होऊ शकतो. याबद्यलचे मौलिक व कौतुकास्पद कार्य आपण मनःपूर्वक केल्यामुळे आपली कृतज्ञता आम्ही व्यक्त करीत आहोत. त्याचप्रमाणे सर्व प्रशिक्षणार्थी आपण केलेल्या मार्गदर्शनान्वये त्यांच्या सेवेच्या ठिकाणच्या केंद्रातही सहजयोगा बाबतचे मार्गदर्शन व लाभही भविष्यात घेतील याची आम्हांस खात्री वाटते.

आपणाकडुन भविष्यातही सहजयोगाचे प्रचार व प्रसाराद्वारे समाजोपयोगी सद्कार्य घडत राहील अशी आम्हास खात्री आहे. आपले या सदकार्यास आमच्या हार्दीक शुभेच्छा.

आपला स्नेहांकित,

(आर. आर. माणगांवकर)
उप संचालक,
गुन्हा अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक



वनदेवी अयुर्वेदीक हर्बल प्रॉडक्टस् प्रा. लि. चे उदघाटन



सर सी.पी. श्रीवास्तव लिखित 'भ्रष्टाचार' पुस्तकाचे उदघाटन





## शिवपुजा २००२

















